web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org

वर्ष-९० | अंक-२२ | मुंबई | गुरुवार २९ मार्च २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने-८ | किंमत: ₹ २

REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

एक चळवळ

## हनुमानपाडा रहिवाशांची समस्या! आज ना. पतंगराव कदमांशी भेट

मुंबई, बुधवार – मुलुंड कॉलनी येथील 'हनुमानपाड्यातील रहिवाशांचे चांदिवली येथे स्थलांतराचे षड्यंत्र' याबाबतचे वृत्त सोमवार २६ मार्चच्या 'नवाकाळ'मध्ये प्रसिद्ध झाले होते. या वृत्ताचा परिणाम म्हणून काल अनेक टीव्ही चॅनेलने मुलुंड कॉलनी परिसरात गर्दी केली होती. हनुमानपाड्यातील सर्व्हे क्रमांक ३७७ च्या मोकळ्या जागेत आमचे पुनर्वसन करावे, अशी येथील नागरिकांची मागणी आहे. ही जागा वनखात्याची आहे.

'नवाकाळ'मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीतून हनुमानपाड्यातील गरीब जनतेने वनमंत्र्यांना मदतीचे साकडे घातले. 'नवाकाळ'च्या संपादिका सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांनी येथील रहिवाशांना मदतीचे ▶ पुढील मजकूर पान ८ वर

# जॉइंट व्हेंचर गिरण्यांवर कारवाईचा मुख्यमंत्र्यांचा इशारा!

# उद्योगाच्या नावाखाली शिलाई मशीन! चौकशी करणार

**मुंबई, बुधवार – मुंबईत काही गिरण्या संयुक्तरीत्या (जॉइंट व्हेंचर) सुरू आहेत. संयुक्तरित्या सुरू असलेल्या या गिरण्यांमध्ये पूर्ण उद्योग अपेक्षित असताना या गिरण्यांमध्ये नाममात्र उद्योग सुरू असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. संयुक्त पद्धतीच्या नावाखाली जर गिरण्या शासनाची फसवणूक करत असतील तर अशा गिरण्यांवर नक्कीच गंभीर कारवाई करण्याचे आश्वासनवजा इशारा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज दिला आहे.**

विधान परिषदेत आज प्रश्नोत्तराच्या तासात सेना आमदार दिवाकर रावते यांनी गिरणी कामगारांच्या घराबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. १ लाख गिरणी कामगारांसाठी २०० एकर जमीन व त्यासाठी १० हजार कोटी रुपये कसे उभारता येईल, याची माहिती देणारे 'चातकांचे वारसदार' हे पुस्तक शिवसेना नेत्यांनी १८ ऑक्टोबर २०११ रोजी मुख्यमंत्र्यांना दिली होती का? त्याबाबत शासनाने काय कारवाई केली? असे प्रश्न आ. रावते यांनी विचारले होते.

या प्रश्नावर उत्तर देताना बंद कापड गिरण्यांचे जागेचे प्रस्ताव मुंबई पालिकेने मंजूर केले, अशा प्रस्तावामधून पालिकेला प्राप्त होणाऱ्या जमिनी जर अजूनही प्राप्त झाल्या नसतील अशा जमिनी तातडीने पालिकेला हस्तांतरित करण्यात येतील. मात्र एनटीसीच्या गिरण्यांबाबत काय? असे आ. रावते यांनी विचारल्यावर एनटीसीच्या गिरण्यांबाबत शासन काही करू शकत नाही, असे उत्तर ना. सचिन अहिर यांनी दिले.

याच वक्तव्याचा धागा पकडत विरोधी पक्षनेते विनोद तावडे यांनी जॉइंट व्हेंचरच्या नावाखाली गिरणी मालकांची सुरू असलेली लपवाछपवी सभागृहाच्या निदर्शनास आणली. मुंबईत न्यू इंडिया युनायटेड, गोल्डमोहर, न्यू सिटी, अपोलो या चार गिरण्या जॉइंट व्हेंचरखाली सुरू आहेत. मात्र पन्नास-शंभर शिलाई मशीन ठेवून या गिरण्या सुरू असल्याचे दाखवायचे आणि गिरणीची जागा आरक्षित करायची, असे गिरणीमालक करू लागलेत, त्यावर सरकार काय करणार आहे? असा सवाल विनोद तावडे यांनी मुख्यमंत्र्यांना केला.

जॉइंट व्हेंचरच्या नावाखाली गिरणीमालकांचे हे उद्योग सुरू असल्याचे खुद्द मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी मान्य केले. मुख्यमंत्री म्हणाले की, जॉइंट व्हेंचरच्या नावाखाली पूर्ण उद्योग अपेक्षित आहे. जॉइंट व्हेंचर करायचे आणि नाममात्र गिरण सुरू ठेवायची ही बाब माझ्याही निदर्शनास आली आहे. जर या गिरण्या शासनाची फसवणूक करीत असतील तर अशा गिरण्यांवर नक्कीच गंभीर कारवाई करण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

जॉइंट व्हेंचरच्या नावाखाली भास्कर इंडस्ट्रीज, पॅन्टलून या बड्या कंपन्यांना चार गिरण्यांची मोठी जागा दिली आहे. मात्र पन्नास ते शंभर शिवणयंत्र आणि एके ठिकाणी फक्त कापडाचे गोडाऊन इतकाच उद्योग सुरू आहे. जॉइंट व्हेंचरचा हा फसवा प्रकार बंद करा यासाठी गिरणी कामगार एकजूटच्या नेतृत्वाखाली गेल्याच महिन्यात करी रोड ते गोल्डमोहर मोर्चा काढण्यात आला. मात्र या मोर्चावेळी केलेली मागणी शासनाने लक्षात घेतली नाही. उलट गिरणी कामगारांवर व नेत्यांवर आरोप लावून त्यांना कोर्टाच्या फेऱ्या घालाव्या लागणार आहेत. हे आरोप मागे घ्यायला हवेत, अशी मागणी आज करण्यात आली.

## गिरणी कामगार घरांच्या किमतीबाबत बैठक संपन्न

मुंबई, बुधवार – गिरणी कामगारांसाठी तयार असलेल्या ६ हजाराच्या वर घरांची किंमत काय असावी याचा निर्णय घेण्यासाठी आज विधान भवनात संसदीय कामकाज व सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २ वाजता बैठक झाली. यावेळी गृहनिर्माण विभागाचे सचिव गौतम चटर्जी, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गवई व इतर सरकारी अधिकारी उपस्थित होते. गिरणी कामगार एकजूटतर्फे गिरणी कामगार नेते दत्ता इस्वलकर, हरिनाथ तिवारी व उदय भट या बैठकीला हजर होते.

एक तासाच्या प्रदीर्घ चर्चेत गिरणी कामगारांना मोफत घर कसे देता येईल, स्वस्त घर कसे देता येईल, गिरणी मालकांची धोरणे याबाबत सर्वांनीच आपापली मते मांडली. यानंतर उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत किमतीचा अंतिम निर्णय होऊन ३० मार्च रोजी अधिवेशनात याबाबत घोषणा होईल, असे संकेत आहेत.

## ठाणे बससेवा हळूहळू बंद पाडण्याची विषप्रक्रिया सुरू

### बसेस बंद! अनेक मार्ग बेस्टला दिले! कर्मचाऱ्यांना भत्ते नाहीत

ठाणे, ता. २८- राजकीय नेत्यांच्या खाजगी वाहनांना मार्ग मोकळा करण्यासाठी फायद्यात असलेली ठाणे बससेवा हळूहळू बंद करण्यासाठी विषप्रक्रिया सुरू झाली आहे.

१९८९ साली स्वर्गीय आनंद दिघे यांनी ठाणे जिल्ह्यात बससेवा सुरू केली. मात्र आता उलटे वारे वाहू लागले आहेत. ठाणे परिवहनची सेवा असताना कोपरी, बोरिवली, घाटकोपर, हिरानंदानी, सिप्झ, म्हाडा वसाहत, ब्रह्मांड, बीकेसी, पवारनगर अशा अनेक परिसरांत बेस्ट बसला परवानगी दिली आहे. यामुळे ठाणे परिवहनचे उत्पन्न बुडते आहे. ठाण्यात ५०० बसेसची गरज असताना केवळ १५० बस चालविल्या जातात. जवाहरलाल नेहरू योजनेखाली ज्या आणखी २०० बस मिळाल्या आहेत त्यापैकी १०० बस नादुरुस्त म्हणून धूळ खात पडून आहेत. या बसेसचे स्पेअरपार्ट उपलब्ध नाहीत, असे सांगितले जाते. एकीकडे ठेकेदारांची सर्व बिले झटपट मंजूर करण्यात येतात, पण बसच्या स्पेअर पार्टचा प्रश्न आला की निधी नसतो. या एकूण स्थितीमुळे प्रवासी तर संतापले आहेतच, पण कर्मचारीही चिडलेले आहेत.

यातच भर म्हणून गेली चार वर्षे ठाणे बस कर्मचाऱ्यांचे भत्ते दिलेले नाहीत. १३ टक्के महागाई भत्ता, वैद्यकीय भत्ता, प्रवासी भत्ता, ५ वा वेतन आयोग लागू केला त्याच्या फरकाची रक्कम, ६ वा वेतन आयोग लागू झाला त्याची फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांना मिळालेली नाही. याविरोधात आंदोलन केले तर शिक्षा होते. म्हणून कर्मचारी सध्या गप्प आहेत. पण आतून संताप पसरत चालला असून त्याचा कधीही स्फोट होण्याची भीती आहे.

ठाणे बससेवा फायद्यात आहे. या बससेवेचा आणखी विस्तार केला जाऊ शकतो. पण मुद्दाम बस नादुरुस्त ठेवायच्या, बसचे मार्ग कमी करायचे, ठाणे जिल्ह्यात बेस्टला परवानगी द्यायची, कर्मचाऱ्यांचे भत्ते चार चार वर्षे प्रलंबित ठेवायचे अशा मार्गाने ही बससेवा बंद पाडण्याचे शिस्तबद्ध प्रयत्न सुरू आहेत.

कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, ठाणे बससेवा ही अत्यावश्यक सेवेच्या श्रेणीत आहे. त्यामुळे आम्ही कोणत्याही प्रकारचे आंदोलन करू शकत नाही. घोडबंदर परिसरात तर नेत्यांच्या मालकीच्या खाजगी बस चालतात त्या आम्हाला रोखता येत नाहीत. गेली चार वर्षे आमचे भत्ते दिलेले नाहीत. ठाणे महापालिका आयुक्त आणि परिवहन सेवेचे अध्यक्ष यांनी याबाबतीत विशेष लक्ष देऊन ठाणे बससेवा वाचवावी.

## शाळात व्यावसायिक बांधकामांना परवानगी देणार नाही जादा शुल्क आकारणाऱ्या शाळांवर उपसंचालकांद्वारे कारवाई

मुंबई, बुधवार- मुंबईत शाळांमध्ये जर नवीन बांधकामे होत असतील तर अशा शाळांमध्ये व्यावसायिक वापरायच्या कामांना बंदी घालण्यात येईल, असा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर नेण्यात येईल, अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांनी आज विधानसभेत केली. यासाठी मुंबई शहर व उपनगरासाठी एक समिती नेमण्यात येईल तर शुल्क नियमन कायद्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळणे बाकी असले तरी सध्या शाळा प्रवेशांचा काळ पाहता, ज्या शाळा जादा शुल्क आकारांतील अशा शाळांवर 'ॲण्टी कॅपिटेशन फी' कायद्यांतर्गत कारवाई करण्याच्या सूचना शिक्षण उपसंचालकांना देण्यात येतील, असे ना. दर्डा यांनी जाहीर केले.

दक्षिण मुंबईतील महाराष्ट्र बोर्डाच्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर असून सीबीएसई, आयसीएसई शाळा मोठ्याप्रमाणात ▶ पुढील मजकूर पान ८ वर




## लवासाला जमीन देण्यास मुगाव रहिवाशांचा विरोध

पुणे, ता. २८ – लवासाला जमीन देण्यास आणि गाव सोडून जाण्यास मुगावमधील रहिवाशांनी विरोध केला आहे. स्थानिक रहिवासी आणि लवासामध्ये अद्याप वाद सुरूच आहेत. मुगावमधील स्थानिक रहिवासी आणि लवासाविरोधी कृती समितीने आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन लवासाला जमीन देण्यास आणि गाव सोडण्यास आपला विरोध असल्याचे स्पष्ट केले. लवासाला केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने दिलेली परवानगी ही कायद्याचे उल्लंघन करणारी आहे, असा दावाही आंदोलकांनी केला आहे. लवासाकडून पहिल्या टप्प्यात घेण्यात आलेल्या जमिनी या बेकायदेशीरपणे घेतल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. लवासाच्या पहिल्या टप्प्यातील दासवे गावातील घरकुल विकली गेल्यानंतर मुगाव गावासाठी बुकिंग ओपन झाल्याचे लवासाने म्हटले आहे. मात्र गावकऱ्यांनी जमीन विक्रीला विरोध केला आहे.

## १४ भ्रष्ट मंत्र्यांच्या विरोधात पुरावे खोटे ठरलो तर आमच्यावर कारवाई करा

**अण्णा हजारे आणि टीम पुन्हा आक्रमक**

राळेगण, ता. २८ – समाजसेवक अण्णा हजारे आणि त्यांच्या टीमने खासदारांवर भ्रष्टाचाराचे उघड आरोप केल्यावर काल लोकसभेत टीम अण्णाविरोधात निंदाव्यंजक ठराव मंजूर झाला. त्यानंतरही अण्णा हजारे आपल्या आरोपांवर ठाम राहिले आहेत.

आज राळेगणसिद्धी येथे बोलताना अण्णा हजारे म्हणाले की, १४ खासदारांच्या भ्रष्टाचाराचे ठोस पुरावे अरविंद केजरीवालकडे आहेत. त्यामुळे शासनाने आता समिती नेमून चौकशी करावी. जर खासदार दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि जर केजरीवालचे आरोप खोटे आहेत हे सिद्ध झाले तर केजरीवालवर कारवाई करावी. पण मुळात चौकशी झाली पाहिजे.

अण्णा हजारे पुढे म्हणाले की, १४ भ्रष्ट मंत्र्यांची १५ ऑगस्टपर्यंत चौकशी झाली नाही तर हे आंदोलन अधिक तीव्र होईल. केजरीवालने केलेले आरोप खरे असले तर काय करणार? अशा लोकांना संसदेत बसू देणार का? लोक भ्रष्टाचाराला कंटाळले आहेत. त्यामुळे तीव्र आंदोलनाच्या तयारीत आहेत. आजवर संसदेत असणाऱ्या वाईट लोकांवर कुणी बोट उठवले नाही त्यामुळे त्यांची संख्या वाढत गेली. आता मात्र त्यांच्या विरोधात लोक रस्त्यावर उतरले आहेत.

## शिर्डी साई संस्थानाच्या अध्यक्षपदी पुन्हा जयंत ससाणे

मुंबई, बुधवार – मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेली डेडलाईन संपण्यासाठी काही तास उरले असताना सरकारने शिर्डीच्या साई संस्थानच्या विश्वस्तांची यादी जाहीर केली. अध्यक्षपदाची माळ पुन्हा एकदा काँग्रेसच्या जयंत ससाणे यांच्या गळ्यात पडली आहे.

औरंगाबाद खंडपीठाने पंधरा दिवसांपूर्वी कालावधी संपल्याने शिर्डी साई संस्थान बरखास्त करण्याची सूचना केली होती. प्रशासक नेमण्याचेही आदेश दिले होते. त्यानुसार ही मुदत संपण्याच्या अखेरच्या रात्री उशिरा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि नगर जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीनंतर नव्या समितीची घोषणा झाली.

नव्या यादीत अकरा नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात ▶ पुढील मजकूर पान ८ वर

**शुभराशी - ७,८,०**






# व्यथा पुरुष वंध्यत्वाची



माझ्यासमोर आज दर पाच पुरुषांमागे एक पुरुष वंध्यत्वाचा बळी आहे. हे निव्वळ पोकळ विधान नाही. विविध अभ्यास आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे अनुभव या गोष्टीची साक्ष देतात. या समस्येचा सामना कसा करायचा हा प्रश्न नंतरचा आहे. मुळात ही समस्या मान्य करायला हवी आणि तिथेच घोडे पेंड खाते. कारण पुरुषाला वंध्यत्व येते हे मान्य करणारी मानसिकता आपल्याकडे नाही. अपत्य झाले नाही की त्याचा दोष नकळत स्त्रीवरच टाकला जातो. वंध्यत्वासंबंधिच्या साऱ्या तपासण्या स्त्रियांनाच कराव्या लागतात; मात्र पुरुष या समस्येचा बळी ठरू शकतो हे आपण मान्य करावे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तिचा सर्वांनीच गंभीरपणे विचार करायला हवा.

**आजवर मूल झाले नाही तर स्त्रीमध्येच दोष आहे असे मानले जात असे.आरोग्यशास्त्रात झालेल्या प्रगतीमुळे वंध्यत्वाची समस्या केवळ स्त्रियांनाच नव्हे तर पुरुषांनाही असू शकते हे समजले. हल्लीच्या जीवनशैलीमुळे पुरुषांच्या वंध्यत्वाची समस्या वेगाने वाढते आहे. वेळीच उपाययोजना केली नाही तर ही समस्या गंभीर स्वरुप धारण करेल असे तज्ज्ञांचे मत आहे.**

**पुरुष वंध्यत्वात वाढ**

आज पाच टक्के पुरुषांमध्ये वंध्यत्वाची समस्या आहे. पुरुष हे 'बीज' आहे तर स्त्री हे 'क्षेत्र' आहे, अशी आपली परंपरा सांगते. याला क्षेत्रबीज न्याय म्हणतात. कोणतेही बी उगवलेच पाहिजे. ते उगवत नाही तेव्हा जमिनीतच काहीतरी दोष असतो असे मानण्याची रीत आहे. अर्थात कसदार बीजाबाबत ही गोष्ट खरी असेलही परंतु बीजसुद्धा निकृष्ट दर्जाचे असू शकते हे लक्षात घेतले तर पुरुष वंध्यत्वाची समस्या मान्य करणे व स्वीकारणे सोपे जाईल.

खरे तर ही समस्या नवी नाही परंतु, आज तिचे प्रमाण वेगाने वाढत आहे. वेळीच उपचार केले तर ही समस्या क्षणात सुटू शकते; परंतु पुरुषाला वंध्यत्व येणे शक्यच नाही अशीच मानसिकता असेल तर या समस्येचा पसारा वाढणार हे उघडच आहे. म्हणूनच आज पुरुष वंध्यत्वाचा प्रश्न बिकट बनला आहे. या समस्येच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. कोणतीही समस्या अथवा विकार परिस्थितीतून उद्भवतो. आजची परिस्थिती व त्यातून घडलेली जीवनशैली आरोग्याला हानीकारक आहे यात कोणतेच दुमत नाही. त्यामुळे अनेक नव्या व्याधी उद्भवताना दिसतात. एवढेच नव्हे तर नको त्या वयात नको त्या व्याधी जडतात. लहान मुलांनासुद्धा रक्तदाबासारख्या समस्येचा सामना करावा लागतो यावरून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते.

**सदोष जीवनशैलीचा परिणाम**

यातूनच पुरुष वंध्यत्वाची समस्या निर्माण झाली आहे. पुरेसा विचार न केल्यामुळे ती झपाट्याने वाढत आहे. अन्य कोणत्याही शारीरिक कारणांच्याआधी कपडे घालण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळेसुद्धा ही समस्या निर्माण होते हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. आज तंग कपडे घालायची फॅशन आहे. यामुळे शुक्राशयाच्या अवतीभवतीचे तापमान वाढते. त्यामुळे शुक्रजंतु मरतात. केवळ वस्त्रांची चुकीची निवडसुद्धा शुक्रक्षयाला कारणीभूत ठरू शकते ही साधी गोष्ट लक्षात येणे कठीण आहे. पुरुष वंध्यत्वाच्या समस्येचे जीवनशैली हे एक महत्त्वाचे कारण आहे. आजच्या जीवनशैलीत तणाव आहे त्याचप्रमाणे सुखासीनतादेखील आहे. तणावामुळे शुक्रजंतुंचा नाश होतो हे एकवेळ लक्षात येते. परंतु सुखासीनतादेखील शुक्रजंतुंना तेवढीच हानीकारक असते. आज अनेक लोक आपल्या स्नानगृहात 'बाथटब' बसवतात. या टबमध्ये गरम पाणी सोडावे, साबणाचा फेस करावा आणि निवांत पडून रहावे अशी स्नानाची आणि सुखाचीदेखील बऱ्याचजणांची कल्पना असते. परंतु या क्रियेमुळे शुक्रजंतु मोठ्या प्रमाणावर नष्ट होतात. टबमधील पाण्याचे तापमान कमीतकमी १ अंश डि.से. एवढे असते. या तापमानात शुक्रजंतु जिवंत रहात नाहीत.

**आरोग्यमंत्र**
**डॉ. ए. कुमार**

**वंध्यत्वाची कारणे**

जसे अन्न खावे तशी बुद्धी होते असे म्हणतात. ही म्हण आरोग्यासाठीही खरी आहे. आहार चौरस व पौष्टिक असेल तर एकंदरच आरोग्य सुधारते. त्याला व्यायामाची जोड असेल तर दुधात साखर पडली असेच म्हणावे लागेल. परंतु, आज नेमक्या याच गोष्टी दुर्मिळ झाल्या आहेत. भुकेच्या वेळी चांगला आहार मिळणे ही चैन झाली, अनेकांना पैसे असूनही केवळ वेळ नाही म्हणून योग्य आहार घेता येत नाही. तर दुसरा गट 'फास्ट फूड'च्या विळख्यात अडकला आहे. अगदी साधी पालेभाजी आणि भाकरीसुद्धा मिळत नाही. भाज्यांवरील रसायने त्यांची सकसता अगोदरच कमी करतात. त्यामुळे चौरस आहारसुद्धा पौष्टिक असेलच असे नाही. अशा परिस्थितीत पुरुषांमध्ये मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीनता आढळते. सिगरेट आणि दारू यांचे सेवन तर सर्रास आढळते. काही व्यसनांना प्रतिष्ठा प्राप्त झाल्यामुळे त्यांच्यापासून दूर राहणे वाटते तेवढे सोपे नाही. परंतु याच गोष्टी वंध्यत्वासारखी समस्या निर्माण करतात.

व्यवसायाचा आणि वंध्यत्वाचा जवळचा संबंध आहे. सतत बैठे काम करणे, उष्णता आणि आगीशी संबंधित असणाऱ्या व्यवसायात काम करणे यामुळेही ही समस्या उद्भवते. टॅक्सीचालक, बेकरी आणि हॉटेलमध्ये काम करणारे लोक यांची उदाहरणे सांगता येतील. अशा प्रकारच्या व्यवसायात उष्णतेचा अधिक संबंध असतो आणि त्यामुळे अशा व्यक्तींच्या शुक्राणुनलिकांची हानी होते. थोडक्यात व्यवसायामुळे वंध्यत्व येऊ शकते. रासायनिक कीटकनाशकांचा वापर हल्ली मोठ्या प्रमाणावर होतो त्याचाही वंध्यत्वाशी संबंध आहे. काही औषधे शुक्राणुंचे प्रमाण कमी करतात. त्यामुळे मूळ रोग नाहीसा झाला तरी ही नवी व्याधी तो जन्माला घालतो. कोणतीही गोष्ट अतिरेकी स्वरूपात केली तर तिचे अनिष्ट परिणाम होतात. अति व्यायाम हे त्याचेच उदाहरण आहे. सायकलिंग, ब्रिस्कवॉकिंग यासारख्या व्यायाम प्रकारांमुळे ही समस्या उद्भवते. उत्तेजकांचे सेवन म्हणजे वंध्यत्वाला निमंत्रण असे मानायला हरकत नाही.

**समस्या टाळावी कशी ?**

जननेंद्रियांभोवती अधिक तापमान निर्माण झाले तर वंध्यत्वाची समस्या उद्भवते हे सर्वप्रथम लक्षात घ्यावे. यासाठीच गार पाण्याने आंघोळ करणे, शरीराचे तापमान नियंत्रित ठेवणे यासारखे उपाय अवलंबायला हवे. आहाराचा विचार करता पौष्टिक आहार गरजेचा आहेच परंतु, चहाऐवजी कॉफीचे सेवन अधिक फलदायी ठरू शकते. अर्थात स्त्रियांनी अतिरिक्त कॉफीपान केले तर मात्र त्यांच्याबाबतीत ही समस्या उद्भवू शकते. वंध्यत्व टाळायचे असेल तर व्यसनांपासून कटाक्षाने दूर रहायला हवे. आपला व्यवसाय वंध्यत्वाला कारणीभूत ठरणार नाही याची जाण ठेवणेही गरजेच आहे. औषधोपचार करताना डॉक्टरांशी सल्लामसलत करणे गरजेचे आहे. अगदी पित्तविकार नाहीसा करणारी औषधेसुद्धा वंध्यत्वाला निमंत्रक ठरतात.

ही समस्या हमखास टाळायची असेल तर रोज कमीतकमी तीन लिटर पाणी पिण्यापासून सुरुवात होऊ शकते. आहारामध्ये व्हिटॅमीन 'सी'चा वापर वाढवणे आवश्यक आहे. फॉलीक ॲसीड, झिंक आदी रसायनांचा वापर हितकर ठरू शकतो. आयुर्वेदात या समस्येवर गुणकारी ठरतील अशी अनेक औषधे आहेत. मूसली, शतावरी, मखा, तालमखाना, तालमुली आदी या औषधी वनस्पती मदतकारक ठरू शकतात.

वंध्यत्वावर उपचार करत असताना दोन लैंगिक संबंधात पुरेसा कालावधी असणेही गरजेचे आहे. एवढी काळजी घेतली तर निकोप वैवाहिक जीवनाचा आनंद उपभोगणे शक्य आहे. केवळ दुर्लक्षामुळे अथवा भीतीमुळे या समस्येकडे दुर्लक्ष होऊ नये. त्याचप्रमाणे अतिउत्साहाच्या भरात वैद्यकीय सल्ल्याशिवाय काही औषधे घेतली तर ही समस्या अधिकच बिकट बनेल.

अधिक माहितीसाठी संपर्क:कायाकल्प इंटरनॅशनल, मुंबई. फोन : (९५२२) २८०५३४३४/२४३३३४३४



महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रभाग क्र. २१५ संपर्क कार्यालयाचे उद्घाटन हिंदुजा महाविद्यालयाचे प्राचार्य टी.ए. शिवारे यांच्याहस्ते करण्यात आले. तत्प्रसंगी सौ. शिवारे, विभाग अध्यक्ष धनराज नाईक, उपाविभाग अध्यक्ष श्रीधर जगताप, शाखा अध्यक्ष श्रीकांत तेंडुलकर, महिला शाखा अध्यक्ष सौ. शकुंतला घोसाळकर, मनिष कवळे, राजेश खोत, निहार आचरेकर, विराज नेरूरकर, समिर सिंग, पल्लवी पाटील, शायदा हुसेन, रेशमा माहिमकर आदी दिसत आहेत.

## मराठी पाऊल पडत आहे पुढे महानंदातर्फे खास आईस्क्रीम उत्पादने

मुंबई, बुधवार - महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई ही राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची राज्यस्तरीय शिखर संस्था आहे. संस्थेचा महानंद दुग्धशाळा या नावाने अद्ययावत प्रकल्प १९८३ मध्ये कार्यान्वित करण्यात आला.

राज्यातील ग्रामीण दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधास वाजवी भाव देणे व शहरी ग्राहकांना चांगल्या गुणवत्तेचे दूध व दर्जेदार दुग्धपदार्थ रास्त भावात उपलब्ध करणे हे दूध महासंघाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महानंद दुग्धशाळेचे महानंद या ब्रॅण्ड नावाने राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, लातूर व कुडाळ या प्रमुख शहरात पॅकिंग करण्यात येणारे दूध नजिकच्या विभागात विक्री करण्यात येते. सध्या महानंद या ब्रॅण्ड नावाने ५.६० लक्ष दुधाची विक्री करण्यात येते. दुधाबरोबरच श्रीखंड, आम्रखंड, दही, पनीर, लस्सी, छास, तूप व सुगंधित दूध ही उत्पादने विक्री करण्यात येतात. यासाठी मुंबई शहर, उपनगरे व राज्यातील प्रमुख शहरात विक्रीचे जाळे उभारण्यात आले आहे.

दूध महासंघाने आपल्या ग्रामीण प्रगतीचा पुढील टप्पा गाठण्यासाठी बाजारपेठेमध्ये 'डायमंड' या नावाने नवीन टोण्ड दूध विक्रीस आणत आहे. या दुधाचे वैशिष्ट्य म्हणजे हे दूध म्हैस दुधाच्या ६०% व गाय दुधाच्या ४०% एकत्रिकरणातून बनविण्यात येणार आहे. त्यामुळे नेहमीच्या दुधाच्या तुलनेत ते गुणात्मकदृष्ट्या अव्वल दर्जाचे असणार आहे. म्हैस दुधाच्या वापरामुळे हे दूध शुभ्र व घट्ट असणार आहे. त्यामुळे यापासून बनविण्यात येणारा चहा अधिक घट्ट, स्वादिष्ट बनणार असून या दुधाचे दही घट्ट व अधिक चवदार होणार आहे.

दुधाबरोबरच दुग्धजन्यपदार्थांची रेंज वाढविण्यासाठी आईस्क्रिम उत्पादने या प्रसंगाने बाजारपेठेत विक्रीस येणार आहेत.

दुग्धपदार्थाच्या उत्पादनांबरोबरच दूध महासंघ महानंद पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर हे उत्पादनही बाजारपेठेत विक्रीस उपलब्ध करणार असून ग्राहकांना चांगल्या प्रतीचे पिण्यास उपलब्ध होणार आहे.

सुप्रसिध्द कलावंत मकरंद अनासपुरे व सोनाली कुलकर्णी यांच्या शुभहस्ते या पदार्थाच्या विक्रीचा शुभारंभ झाला. असेही महानंदचे अध्यक्ष सुरेश धस, उपाध्यक्ष दीपक पाटील आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. रा.द.शिंदे यांनी याबाबत फार आनंद व्यक्त केला.

## ओवरीपाडा, दहिसर (पूर्व) येथे भव्य पालखी सोहळा, साई भंडारा

मुंबई, बुधवार- साईधाम मंदिर, हरिश्चंद्र महाजन मार्ग, ओवरीपाडा, दहिसर (पूर्व) येथे श्री रामनवमी उत्सवानिमित्त भव्य पालखी सोहळा व साई भंडारा संपन्न होणार आहे. ओम साईसेवक मंडळ, ओवरीपाडा, साईधाम मंदिरातर्फे त्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार १ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजल्यापासून काकड आरती, अभिषेक सोहळा, आनंद दाभोळकर यांचे कीर्तन, रामजन्म व मध्यान्ह आरती व भव्य पालखी मिरवणूक संपन्न होणार आहे.

सोमवार २ एप्रिल रोजी भव्य साई भंडारा, शत्रुघ्न मांजरेकर यांचे सुस्वर भजन आदी कार्यक्रम होणार आहेत. भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

## मौजे जैतापूर, खेड येथे रामायण कथेचे आयोजन

मुंबई, बुधवार- नवयुग मित्र मंडळ, मौजे जैतापूर (प्रभुवाडी), ता. खेड, जि. रत्नागिरी यांच्या सौजन्याने शुक्रवार ३० मार्च ते ६ एप्रिल हनुमान जयंतीपर्यंत श्री समर्थ सद्गुरू सीताराम स्वामी शेडगे यांच्या रामायण कथेचे आयोजन रात्री ९ ते ११ या वेळेत करण्यात आलेले आहे.

यादरम्यान होमहवन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, हरि कीर्तन इ. परमार्थिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या उत्सवाची सांगता प. पू. सद्गुरू मोरे माऊली यांच्या हरिकीर्तनाने होणार आहे. यावेळी विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## तीर्थक्षेत्र असलेल्या आईच्या उदराला स्मशानभूमी करण्याचे अत्यंत क्रूर काम सध्या सुरू आहे

अकोले, ता. २८ - तीर्थक्षेत्र असलेल्या आईच्या उदराला आज स्मशानभूमी करण्याचे अत्यंत क्रूर काम सध्या समाजात सुरू असून स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण चिंताजनक असल्याचे स्त्री-भ्रूण हत्याविरोधी चळवळीच्या सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुधा कांकरिया यांनी सांगितले.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत तालुका आरोग्य कार्यालय पं.स. अकोले (जि. नगर) आरोग्य विभागाच्या वतीने येथील सांस्कृतिक भवनात 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या विषयाचे डॉ. सुधा कांकरिया यांच्या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

वेळ नाही गेली अजून हाक देते मी तुला, खुडू नको कळी आई देश घडवायचाय मला! अशी आर्त हाक चिमुकली आईच्या उदरातून देते आहे. आई मला जन्माला येऊ दे, मी खरंच तुला त्रास देणार नाही. तू जे देशील ते मी खाईन हट्ट कधीच करणार नाही. तक्रार करणार नाही. तू देशील जसे ठेवशील तशी राहू आई मला जन्माला येऊ दे. ही पोटात असलेल्या चिमुरडीची हाक डॉ. कांकरिया यांनी शब्दबध्द केली आणि उपस्थितांचे डोळेच भरून आले. स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी वैयक्तिक, सामूहिक संकल्प करा, आमच्या कुटुंबात एकही स्त्रीभ्रूण हत्या होणार नाही, स्त्रीजन्माचे स्वागत होईल, नकोशीला आपलेसे करू ग्रामपंचायतींनीही यासाठी संकल्प सोडा, असे आवाहन त्यांनी केले.

## थोडक्यात

### अश्लील चित्रफीत बनविणाऱ्याची आत्महत्या

मालवण, ता. २८ - गरीब मोलमजुरी करणाऱ्या असहाय महिलेचे लैंगिक शोषण करून तिची अश्लील चित्रफीत बनविण्याच्या प्रकरणात आचरा गावातील चारुदत्त धोंडू परब या ४२ वर्षीय रिक्षाचालकाने आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

### नोकरीच्या आमिषाने महिलांची फसवणूक

कणकवली, ता. २८ - एल.जी. कंपनीत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून १४ महिलांकडून ८ लाखांचे सोने घेणाऱ्या इसमाच्या विरोधात कणकवली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### भोस्ते घाटात जोडप्यांचा धुमाकूळ

खेड, ता. २८ - खेड शहराजवळील भोस्ते घाटात रस्त्याच्या बाजूच्या कट्ट्यावर तरुण जोडपी प्रेमाचे चाळे करीत असतात. सध्या हे प्रमाण प्रचंड वाढले आहे.

### विहिरीत उतरताना दोर तुटल्याने मृत्यू

बांदा, ता. २८ - इन्सुली-कोठावळे बांध येथील हरिश्चंद्र बाबलो सावंत हे विहिरीमध्ये पडलेले नारळ काढण्यासाठी दोराच्या सहाय्याने विहिरीत उतरले असता, दोर तुटल्याने सावंत यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

## माहिती देण्यात टाळाटाळ होत आहे मनसेचा आंदोलनाचा इशारा

सिंधुदुर्ग, ता. २८ - सर्वसामान्यांसाठी आरोग्य सेवा देणाऱ्या स्वास्थ विमा योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यात लागणारी वाहने सिंधुदुर्गऐवजी अमरावती जिल्ह्यातून मागविली जात आहेत. या योजनेची, त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांची माहिती ही माहितीच्या अधिकाऱ्यास मागूनही न दिल्याबद्दल मनसेचे सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष राजन दाभोळकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

माहिती मिळविण्याची मुदत संपली तरी माहिती देण्यात टाळाटाळ होत असल्याने मनसे तीव्र आंदोलन उभारेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

सिंधुदुर्गात स्वास्थ विमा योजनेच्या होत असलेल्या कामाची माहिती सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी विरेंद्रसिंह यांच्याकडे माहितीच्या अधिकारात २० मार्च रोजी मागण्यात आली. मार्च महिना संपत आला तरी याबाबत माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप मनसे जिल्हाध्यक्ष राजन दाभोळकर यांनी केला आहे.

७५ हजार लाभार्थींना लाभ देण्याची माहिती जिल्हा कामगार अधिकारी मंगेश सावंत यांनी प्रसिध्द केली आहे. मात्र सिंधुदुर्गात वाहने व साधनसामग्री उपलब्ध असताना ती अमरावतीसारख्या दूरच्या जिल्ह्यातून मागविली जातात. होणाऱ्या अतिरिक्त खर्चाची माहिती मनसेने मागविली आहे.

## चक्रधर कन्स्ट्रक्शनच्या कार्यालयांवर धाडी

भुसावळ, ता. २८- जळगाव येथील चक्रधर कन्स्ट्रक्शनच्या जळगाव व केऱ्हाळा, ता. रावेर येथील कार्यालयांवर आयकर विभागाच्या पथकाने धाडी टाकल्याने जळगावात खळबळ उडाली आहे.

चक्रधर कन्स्ट्रक्शन्सचे संचालक महेंद्र पाटील हे असून त्यांची बहुतांशी कामे पाटबंधारे विभागात चालतात. जळगाव येथील तापी पाटबंधारे विभागातील तत्कालीन कार्यकारी अभियंता व्ही. डी. पाटील यांचे महेंद्र पाटील हे शालक आहेत. व्ही. डी. पाटील हे सध्या धुळे मध्यम प्रकल्प क्र. २ नंदुरबार विभागात प्रमुख कार्यरत आहेत.

आयकर आयुक्त बी. पी. सिंह यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली आहे. अद्याप कारवाई सुरू आहे.

## जनावरांच्या चाऱ्याची तीव्र टंचाई

चिचोंडी पाटील, ता. २८- येथील परिसरात जनावरांच्या चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे. विविध भागांत चाऱ्यांचे भाव आकाशाला भिडले आहेत. पाणीटंचाईचा चाऱ्यावर परिणाम झाला आहे.

## मौजे सुकोंडी, दापोली येथे भव्य रामनवमी उत्सव

दापोली, ता. २८- दापोली तालुक्यातील मौजे सुकोंडी, मासेकरवाडी येथे रविवार १ एप्रिल रोजी भव्य श्री रामनवमी उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १२ वाजल्यापासून राम जन्मोत्सव, महाप्रसाद, पालखी मिरवणूक, रात्री ९ वा. प्रमोद मेहेंदळे यांचे कीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत. भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, अशी विनंती मंडळाचे सचिव सुनील रहाटवळ यांनी केली आहे.

वविशमपा/बांध/१६२१/२०१२ दि. २६-३-२०१२

**वसई विरार शहर महानगरपालिका**

**निविदा सूचना**

वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे, अप्रोच ब्रीज व इतर संबंधित कामे यांसाठी आरेखन, अंदाजित खर्च आराखडे इ. मधील अनुभव असलेले सल्लागार तसेच आरेखन सल्ला, सेवा, अंदाजित खर्च, आराखडा इ. करिता एम.एस.आर.डी.सी./एम.एम.आर.डी.ए./पी.डब्ल्यू.डी/सी.आय. डी.सी.को.इ. कडे सूचीबध्द असणाऱ्या सल्लागारांकडून पुढील कामासाठी मोहोरबंद ठोक निविदा मागवण्यात येत आहेत. **(रेल्वे फाटक क्र. ४० वर बांधणेत आलेल्या ओव्हर ब्रीज वरून विरार पूर्वेस जाणे-येणे साठी अप्रोच ब्रिजचे, नकाशे, आराखडे, अंदाजपत्रक सुपरव्हिजनसाठी 'सल्ला सेवा' पुरविणे.) कामाचा अंदाजित खर्च** : रु. ७.०० कोटी (सुमारे). **इसारा रक्कम ठेव** : रु. १०,०००/- **कोऱ्या निविदा अर्ज वितरणासाठी अर्जस्वीकृतीची आणि कोरे निविदा अर्ज वितरणाची तारीख** - ०२/०४/२०१२ ते १२/०४/२०१२ (दु. ३.००पर्यंत) कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या कार्यालयात कोऱ्या निविदा अर्जाची किमत : रु. १,०००.०० (विनापरतावा) **मोहोरबंद निविदा दाखल करण्याची तारीख** : १६/०४/२०१२ स. ११.०० ते दु. १.०० यांच्या कार्यालयात **निविदा उघडण्याची तारीख** : १६/०४/२०१२ रोजी दु. २.३० वाजता (शक्य असल्यास) पुढे दिलेल्या बंधनकारक आवश्यकता पूर्ण करणाऱ्या सल्लागारांचाच केवळ कोऱ्या निविदा अर्ज वितरणासाठी विचार करण्यात येईल. (अ) मागील ५ वर्षात संबंधित आयएस कोडस व आय आरसी स्पेसिफिकेशनचा वापर करून किमान रु. २० कोटी खर्चाच्या नदी/खाडी क्षेत्रावर स्थित पुलाच्या डिझाईन किंवा उड्डाणपूल डिझाईनचा अनुभव आवश्यक (ब) मागील ३ आर्थिक वर्षात सरासरी वार्षिक उलाढाल किमान २०.०० लाख प्रती वर्ष असावी. (क) संगणक आणि अद्ययावत डिझाईन सॉफ्टवेअर ऑटोकॅड, प्लॉटर इ. उपकरणे असावीत.

**सूचना:**

१. कोणतेही कारण न देता कुठलीही एक वा सर्व निविदा जारी करण्याचे, स्वीकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार वसई विरार शहर महानगरपालिका राखून ठेवत आहे.
२. अधिक माहितीकरिता कृपया कार्यकारी अभियंता वसई विरार शहर महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधावा.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

## प्रत्येक चोर गावात असल्याची अफवा! पोलीस, नागरिकांची तारांबळ

महाड, ता. २८ - बिरवाडी टाकी कोंड येथील दरोड्यानंतर पोलिसांनी मोठ्या कौशल्याने पाच आरोपींना अटक केली असली तरी चोरांच्या दैनंदिन अफवेने तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली असून पोलीस त्रस्त झाले आहेत.

मागील आठवड्यापासून प्रत्येक गावात चोर आल्याच्या अफवेने नागरिकांसहित पोलिसांचीही चांगलीच धावपळ उडाली आहे. एकीकडे पोलीस कर्मचाऱ्यांचा तुटवडा तर दुसरीकडे कायदा व सुव्यवस्थेची गंभीर समस्या आहे. यातच तालुक्यात वेड्यांचा सुळसुळाट झाल्याने वेड्यांनाच चोर समजून बेदम मारहाण करण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. कोणतीही अनोळखी व्यक्ती दिसली की, त्याची सविस्तर व सखोल चौकशी न करताच त्याला मारझोड करण्याचे प्रकार वाढल्याने याचा निष्पाप व निरपराधांना नाहक फटका बसत आहे. मंगळवारी सायंकाळी मुंबई-गोवा महामार्गालगत असणाऱ्या सावित्री नदीच्या विसावा डोहात उडी मारलेल्या एका अनोळखी व्यक्तीस जबरदस्त मारहाण करण्यात आली. पोलिसांनी मध्यस्थी करून त्याचे प्राण वाचविले. प्राथमिक चौकशीअंती तो मूकबधीर वेडा असल्याचे समजले. यादरम्यान महामार्गवरील वाहतूक काही वेळ बंद होऊन तणावाचे वातावरण पसरले. तद्नंतर जमलेल्या जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना मोठी अडचण झाली. लोकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आणि भावनेच्या आहारी कायदा हातात घेऊ नये, असे वारंवार आवाहन करूनही जनता ऐकण्याच्या पलीकडे गेल्याने यावर काय करावे? हाच पोलिसांसमोर यक्ष प्रश्न आहे.तरीही जनतेने सामंजस्याची भूमिका घेत पोलिसांना सहकार्य करावे, अन्यथा कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यावाचून पर्याय उरणार नसल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.



**महाराष्ट्र नवनिर्माण सेना**



**साधना सुनील जाधव**
**(उरणकर)**
**माजी विभागअध्यक्षा अंधेरी (पूर्व)**
**यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**



**शुभेच्छुक: सुनील काशिराम जाधव**

# बंधाऱ्यात पडून दोन सख्ख्या भावांचा मृत्यू

येवला, ता. २८ – येवला तालुक्यातील सत्यगाव येथे म्हशींना पाणी पाजण्यासाठी घेऊन गेलेल्या दोन सख्ख्या भावांचा दुपारी बंधाऱ्यात बुडून मृत्यू झाला. बंधाऱ्यातील गाळात अडकलेल्या या दोन मुलांना बाहेर काढण्याची दुर्दैवी वेळ वडिलांवर आली. या घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

सत्यगाव शिवारातील गोई नदीवर धामोरी (ता.कोपरगाव) ग्रामपंचायतीची पाणीपुरवठा योजना आहे. या योजनेचा बंधाऱ्याजवळ रवींद्र सांगळे यांची शेती आहे. ते कुटुंबासह शेतात काम करीत असतांना, दुपारी दोनच्या सुमारास त्यांची दोन मुले विकास रवींद्र सांगळे (१३), व समाधान रवींद्र सांगळे (११), बंधाऱ्यावर म्हशींना पाणी पाजण्यासाठी घेऊन गेल होते. दुपारच्या रखरखत्या उन्हात दोघे भाऊ अंघोळीसाठी पाण्यात उतरले. पण गाळाचा अंदाज न आल्याने दोघेही गाळात फसल्याने त्यांचा मृत्यू झाला. गेल्या पंधरा मिनीटांपासून मुले दिसत नसल्याने शेतात काम करीत असलेल्या वडिलांनी बंधाऱ्यावर जाऊन शोधाशोध केली. तेव्हा मुलगे बुडाल्याचे लक्षात आले. त्यांनी स्वत:च बंधाऱ्यात उतरून आपल्या मुलांचे मृतदेह बाहेर काढले.

# नवी मुंबईत सराफांचा बंद

नवी मुंबई,ता.२८– केंद्र सरकारने सोन्यावर लादलेल्या आयात कराचा निषेध करण्यासाठी नवी मुंबईतील सराफांनी आज वाशी येथे मूक मोर्चाचे आयोजन केले होते.

केंद्रीय अर्थसंकल्पात सोन्याच्या आयातीवर ४ टक्के कर लागू करण्यात आला आहे. या करवाढीला देशभरातून विरोध होत आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ देशभरातील सराफानी आंदोलनाचे हत्यार उगारले आहे. या आंदोलनाचे पडसाद नवी मुंबई,पनवेल परिसरातही उमटू लागले आहे. सरकारने आयात कराची अट रद्द करावी,या मागणीसाठी नवी मुंबईतील सराफांनी आज वाशी सेक्टर १७ येथून मूक मोर्चा काढला. या मोर्चात ऐरोली ते पनवेलपर्यंतच्या सराफांनी भाग घेतला होता. केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अशाप्रकारचे आंदोलन केल्याची माहिती नवी मुंबई ज्वेलर्स वेल्फेअर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

# पुरेसा दारूगोळा नाही! सक्षम उपकरणे नाहीत
# लष्करप्रमुखांचे पंतप्रधानांना पत्र! एकच खळबळ!

नवी दिल्ली, ता. २८– भारताचे लष्करप्रमुख जनरल व्ही. के. सिंग यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना अत्यंत खळबळजनक पत्र पाठविले आहे. काही दिवसांपूर्वी १२ मार्चला हे जनरल व्ही. के. सिंग यांनी हे पत्र पाठविले आहे. देशाची सुरक्षा गंभीर स्थितीत आहे. परकीय आक्रमणाला थोपविण्यासाठी पुरेसा दारूगोळा नाही, असे जनरल व्ही. के. सिंग यांनी या पत्रात स्पष्ट नमूद केले आहे. जनरल व्ही. के. सिंग यांच्या या पत्रानंतर सर्वत्र खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, जनरल व्ही. के. सिंग यांनी या पत्रात म्हटले आहे की, शत्रुच्या रणगाड्यांचा पाडाव करण्यासाठी लष्कराच्या रणगाड्यांमध्ये प्रभावी व परिणामकारक असा दारूगोळा नाही.

त्यांनी पुढे म्हटले आहे की, हवाई सुरक्षा यंत्रणेतील ९७ टक्के उपकरणे नीट काम करीत नाहीत.

पायदळाकडे सक्षम उपकरणे नाहीत. त्याचबरोबर रात्रीच्या वेळी शत्रुशी मुकाबला करण्यासाठी आवश्यक शस्त्र यंत्रणा नाही. त्याचबरोबर खास विशेष दलाकडे आवश्यक अशी यंत्रणा नाही. सुरक्षा यंत्रणाच्या काही क्षेत्रामध्ये त्रुटी आहेत.

जनरल व्ही. के. सिंग यांनी पत्रात म्हटले आहे की, लष्करी उत्पादनाचा दर्जा चांगला नाही. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत तातडीची आवश्यकता असते. त्याचा अभाव जाणवत आहे. या त्रुटी लवकरात लवकर दूर होतील, अशी अपेक्षा जनरल व्ही. के. सिंग यांनी या पत्रात व्यक्त केली आहे.

लोकसभेचे कामकाज तहकूब

दरम्यान, जनरल व्ही. के. सिंग यांच्या सनसनाटी 'लेटरबॉम्ब'चे तीव्र पडसाद उमटले आहेत. लोकसभा व राज्यसभेत प्रचंड गोंधळ माजला. लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. राज्यसभेचे कामकाज काही वेळ तहकूब करण्यात आले.

विविध पक्षांच्या खासदारांनी सांगितले की, ही बाब अतिशय गंभीर आहे. संरक्षण मंत्री ए. के. अँटोनी यांनी सांगितले की, भारतीय लष्कराकडे पूर्ण संरक्षण सिद्धता आहे.

# नांदेड जिल्हा परिषदेचा कारभार गतिमान करणार –दिलीप पाटील–बेटमोगरेकर

नांदेड, ता. २८ – ग्रामीण भागाच्या विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या जिल्हा परिषदेमार्फत सर्व सामान्यांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाच्या सहकार्याने कारभार गतिमान करण्याचा संकल्प जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष दिलीप पाटील–बेटमोगरेकर यांनी व्यक्त केला असून त्यांनी सोमवारी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारून कामाला प्रारंभ केला आहे.

दिलीप पाटील–बेटमोगरेकर यांची जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी काल रितसर पदभार स्वीकारला. यावेळी त्यांचे अधिकारी, कर्मचारी व विविध संघटनांनी जोरदार स्वागत केले. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशावह यांच्या उपस्थितीत सर्व विभाग प्रमुखांची एक बैठक घेऊन जिल्हा परिषदेच्या कामाचा आढावा घेतला. जिल्हा परिषदेचा कारभार अधिक गतिमान करून नांदेडची जिल्हा परिषद कार्यक्षम संस्था म्हणून नावारूपाला नेण्याचा संकल्प व्यक्त केला. यासाठी अधिकारी, कर्मचारी व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य घेतले जाईल, असे ते म्हणाले. जिल्हा परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्था जिल्ह्याच्या विकासाचा केंद्रबिंदू असल्याचे सांगून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी ज्या विश्वासाने माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला काम करण्याची संधी दिली त्यांचा विश्वास सार्थ करून दाखवेन असे सांगितले.

दरम्यान, बेटमोगरेकर यांचा जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ व जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेच्या वतीने भव्य असे स्वागत करण्यात आले. सकाळी सचखंड गुरुद्वाऱ्यात जाऊन बेटमोगरेकर यांनी दर्शन घेतले. यावेळी त्यांचा गुरूद्वाराच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी गुरूद्वाराचे सहाय्यक अधीक्षक स.ठानसिंग बुंगई, मनपा सभापती स.भागींदरसिंघ घडीसाज, स.रविंद्रसिंघ बुंगई, जीवन दरेगावे, बालाजी सावकार, गुरुचरणसिंघ घडीसाज, विकास भोसले आदी उपस्थित होते.

# रक्तपेढीबाबत उच्च न्यायालयात जावे लागणार!

नगर, ता. २८ – महापालिकेच्या रक्तपेढीचा परवाना रद्द करण्याच्या कारवाईस स्थगिती मिळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांकडे अपिल करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला असला तरी यासंदर्भातील आदेशात असे अपिल करण्याची संधी देण्यात आलेली नाही. त्यामुळे स्थगितीसाठी मनपाला उच्च न्यायालयातच दाद मागावी लागणार आहे. त्यामुळे मंत्र्यांकडे अपिलात वेळ घालविण्यापेक्षा तातडीने न्यायालयात जाणे गरजेचे आहे.

तपासणीत आढळलेल्या त्रुटींमुळे रक्तपेढीचा परवाना ५ एप्रिलपासून कायस्वरुपी रद्द करण्याचे आदेश नाशिक येथील अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त एस.डी.चौधरी यांनी काढले आहेत. यासंदर्भात महापौर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी आयुक्त संजय काकडे, उपमहापौर गीतांजली काळे, स्थायी समिती सभापती अनिता राठोड, सभागृह नेता बाबासाहेब वाकळे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती किरण उनवणे, उपसभापती मालन ढोणे, विरोधी पक्षनेते विनीत पाऊलबुधे, नगरसेवक अंबादास पंधाडे, माजी नगरसेवक अनिल शिंदे आदी उपस्थित होते.

रक्तपेढीबाबत मनपा प्रशासनाने केलेल्या हलगर्जीपणाचा जाब यावेळी पदाधिकाऱ्यांनी आयुक्त काकडे व उपायुक्त झगडे यांना विचारला. त्यावर यास निलंबित वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे हे जबाबदार असल्याचे सांगत त्यांनी कुठलीही कल्पना दिली नसल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावर संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी तीन दिवस रक्तपेढीचा परवाना निलंबित केला. त्यावेळी दाखविण्यात आलेल्या त्रुटींबाबत अद्याप दुरुस्ती का झाली नाही? असा सवाल करीत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. उपायुक्तांनी तीन महिने दुरुस्तीच्या प्रस्तावाची फाईल दाबून का ठेवली? असा सवाल उपसभापती उनवणे व अनिल शिंदे यांनी केला. त्यावर बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव महासभेपुढे असल्याचे कारण सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यावर हे दोन विषय वेगळे असून, हा हलगर्जीपणा असल्याचा आरोप शिंदे व पंधाडे यांनी केला. महिला व बालकल्याण समितीने देशपांडे रुग्णालयासाठी दीड कोटीच्या निधीची तरतूद केली. मात्र वर्षभरात हा निधी खर्च झाला नाही. त्यास जबाबदार कोण? असा सवाल करीत अधिकाऱ्यांना खडसावण्यात आले. यावर ६५ लाख रुपयांचा निधी लॅप्स झाल्याचे उपायुक्त झगडे यांनी सांगितल्यानंतर सभापती उनवणे, पाऊलबुधे यांनी संताप व्यक्त करीत, असे होणार असेल तर निधीची तरतूद करण्यात अर्थ काय, असा सवाल केला. शेवटी परवाना रद्दच्या आदेशाविरुध्द अन्न व औषध प्रशासन मंत्र्याकडे स्थगितीसाठी अपिल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# शिर्डीला जाणाऱ्या भाविकांची गर्दी वाढली

नाशिक, ता. २८ – रामनवमी जवळ आल्याने शिर्डीला जाणाऱ्या भाविकांचा ओघ वाढला आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, वाडा, मोखाडा, जव्हार येथील रोज हजारो साईभक्त साईनामाचा गजर करत शहरातून शिर्डीकडे प्रस्थान करत असल्याने शहरातील तसेच महामार्गावरील वातावरण धार्मिक झाले आहे. साईभक्तांच्या वर्दळीमुळे नाशिक–पुणे महामार्ग गजबजला असून वाहनचालकांना महामार्गावरील कोंडीचा सामना करावा लागत आहे.हातात टाळ, गळ्यात विणा, कपाळी भगवी पट्टी, खांदयावर भगवा झेंडा, मुखी साईनामाचा गजर, ध्यानी साईची भेट या दृश्याने अवघा नाशिक–मुंबई, नाशिक–पुणे महामार्ग न्हाऊन निघाला आहे. रणरणत्या उन्हाची पर्वा न करता साईभक्त पदयात्रेने शिर्डीला जात असल्याने त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

# मुंबईत दोन दिवस पाणीपुरवठा बंद

मुंबई, बुधवार – मुंबईत जलवाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी दोन दिवस पाणीपुरवठा बंद राहणार आहे. क्वारी रोड आणि लाल बहाद्दूर शास्त्री मार्ग जंक्शनवर जलवाहिनीच्या छेद जोडणीचे काम २९ आणि ३० मार्च दरम्यान हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे विक्रोळीच्या काही भागात गुरुवारी २९ मार्चला तर भांडुपच्या काही भागात शुक्रवारी ३० मार्चला पाणीपुरवठा बंद राहील.

पालिकेच्या एस वॉर्डाच्या विक्रोळी पश्चिम परिमंडळात कांजुरमार्ग (प), नेवल डॉकयार्ड कॉलनी, विक्रोळी (पू) संतोषी मातानगर, सूर्यानगर, सनासिटी परिसर, गोदरेज कॉलनी, एलबीएन मार्ग, विक्रोळी स्टेशन परिसर, लोअर डेपो परिसरात पाणीपुरवठा उद्या होणार नाही.

भांडूप (प) येथील प्रतापनगर रोड, क्वारी रोड, टँक रोड, सुभाष नगर, जनता मार्केट, एसबीएस रोड पूर्व आणि पश्चिम यामध्ये मुलुंड गोरेगाव जोड रस्त्यावरून गांधीजंक्शन पर्यंतच्या भागात शुक्रवारी पाणीपुरवठा बंद राहील.

# न्यायालयाची बंदी असतांनाही खेड तालुक्यात बैलगाडी शर्यत

रत्नागिरी, ता. २८ – राज्यात बैलगाडी शर्यतीवर शासनाने बंदी घातलेली असतानाही हा आदेश धुडकावून लावत खेड शहरापासून १२ कि.मी. अंतरावर असलेल्या गावात दोन दिवसांपूर्वी आयोजित बैलगाडी शर्यतीदरम्यान एक बैलगाडी उधळून ती अन्य तीन बैलगाड्यांवर आदळल्याने चौघेजण गंभीर जखमी झाले आहेत. मात्र या गंभीर प्रकारावर पडदा टाकण्यात आला आहे.

मुक्या प्राण्यांना अमानुष मारहाण तसेच बैलगाडी स्पर्धा आयोजित करण्यावर शासनाने बंदी घातली आहे. मात्र ही बंदी धुडकावून लावत गावात आयोजित ६०० मीटर लांबीच्या बैलगाडी स्पर्धेत जिल्हाभरातील ३५हून अनेक बैलगाड्या सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेवेळी एक बैलगाडी अचानक उधळून ती अन्य तीन गाड्यांवर आदळली. यामुळे या गाड्यांवरील चालक जमिनीवर कोसळून त्याच्या छाती, पोट व डोक्यावर गाड्यांची चाके गेल्याने तो गंभीर जखमी झाला. या स्पर्धेला अपघाताचे गालबोट लागल्याने ही स्पर्धा आयोजकांनी लागलीच आटोपती घेतली. तसेच या गंभीर प्रकाराबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली असून जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## लष्करप्रमुखांवर अब्रुनुकसानीचा दावा ठोकणाऱ्या तेजींदर सिंहाचा 'आदर्श'मध्ये फ्लॅट!

मुंबई, बुधवार– लष्करप्रमुखांपुढे १४ कोटी रुपयांची लाच देण्याचा प्रस्ताव ठेवल्याचा आरोप झालेल्या निवृत्त लेफ्टनंट जनरल तेजींदर सिंह यांनी पाच विद्यमान अधिकाऱ्यांविरोधात अब्रु नुकसानीचा दावा ठोकला. मात्र, या प्रकरणाला आता नाट्यमय वळण लागले असून तेजींदर यांचा मुंबईतील वादग्रस्त असलेल्या आदर्श सोसायटीत त्यांच्या नावावर फ्लॅट असल्याची माहिती पुढे आली आहे. आदर्श इमारतीच्या दहाव्या मजल्यावरचा फ्लॅट नं. १००२ हा तेजींदर सिंहाच्या नावावर आहे. या धक्कादायक माहितीमुळे खळबळ उडाली आहे. लॉबिस्टने १४ कोटी रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न केल्याच्या लष्करप्रमुखांच्या आरोपाने देशभरात खळबळ उडाली असून संसदेच्या दोन्ही सभागृहांत त्याचे पडसाद उमटले. संरक्षण मंत्री ए. के. अँटोनी यांनी संसदेत लाच देणाऱ्याचे नाव उघड केले. त्यानंतर तेजींदर सिंह यांच्यावर कारवाई करावी, असे लष्करप्रमुख व्ही. के. सिंह यांनी सांगितले होते. यानंतर लष्करप्रमुखांसह पाच विद्यमान अधिकाऱ्यांविरुद्ध तेजींदर सिंह यांनी अब्रुनुकसानीचा दावा ठोकला आहे.

# अर्धापूर बसस्थानक परिसरात ट्रकने दुचाकीस्वारास चिरडले

नांदेड, ता. २८ – नांदेडहून हिंगोलीकडे जाणाऱ्या भरधाव वेगातील ट्रकने दुचाकीला रस्ता ओलांडताना जबर धडक दिली. यामध्ये एक जण जागीच ठार, तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना अर्धापूर येथे घडली.

लोणी (खु.) येथील रत्नपाल लोणे व त्याचा मित्र काम आटोपून दुचाकीने रस्ता ओलांडत होते. यावेळी अर्धापूर बसस्थानक परिसरात भरधाव वेगातील ट्रकने दुचाकीला जबर धडक दिली. यामध्ये दुचाकीस्वार रत्नपाल दिगांबर लोणे (वय २८, रा.लोणी (खु) हे ट्रकच्या समोरच्या चाकाखाली आल्यामुळे डोक्याला गंभीर दुखापत झाली. यामध्ये ते जागीच ठार झाले तर प्रकाश नरसाजी लोणे (वय २४ रा.लोणी खु.) हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी ट्रकचालकास ताब्यात घेण्यात येऊन गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या परिसरात अनेक वेळा अपघात होत असून यामध्ये कित्येकांचा बळी गेला. नांदेड – हिंगोली राज्य महामार्गाचे चोपदरीकरण करण्यात आले. याठिकाणी मोठी जागा आजूबाजूने रिकामी आहे, पण रिकाम्या जागेचा वाहनधारक, फळ – भाजीपालेवाले, अतिक्रमणधारक घेत आहेत. या रस्त्याच्या मधोमध अक्षरशः मोठी गर्दी असते. हायवे असल्यामुळे वाहने भरधाव वेगात येतात. यामुळे मोठे अपघात होतात. याकडे नगर पंचायतने सार्वजनिक बांधकाम विभागाचे, पोलिसांचे दुर्लक्ष आहे. अर्धापूर बसस्थानक परिसरात ट्रकने दुचाकीस्वारास चिरडले

# फेरीवाल्यांवरील कारवाई रोखण्यासाठी शिवसेना रस्त्यावर

नवी मुंबई,ता.२८: नवी मुंबई महापालिकेने फूटपाथवर व्यवसाय करून नागरीकांची गैरसोय करणाऱ्या फेरीवाल्यावर कारवाई सुरु केली आहे. मात्र महापालिकेने फेरीवाल्यावरील कारवाई बंद करावी, या मागणीसाठी शिवसेनेने मंगळवारी महापालिका मुख्यालयावर धडक मोर्चा काढला.

नवी मुंबई शहरात फेरीवाल्याचा प्रश्न उग्र होत चालला आहे. पदपथावर बसणाऱ्या फेरीवाल्यांमुळे नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. याप्रकरणी पालिका प्रशासन ठोस कारवाई करीत नसल्याची ओरड नवी मुंबईकर करू लागले. नागरीकांचा रोष लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने पालकमंत्र्यांच्या आदेशानंतर फेरीवाल्यावर धडक कारवाई सुरू केली आहे. मात्र आता शिवसेनेने फेरीवाल्यावरील कारवाई तातडीने थांबवावी, अशी मागणी करीत मंगळवारी पालिका मुख्यालयावर मोर्चा नेला.

जोपर्यंत फेरीवाला धोरण निश्चित होत नाही, तोपर्यंत फेरीवाल्यावर कारवाई करू नये अशी मागणी शिवसेनेने केली आहे. याप्रकरणी पालिका उपायुक्त जगन्नाथ सिन्नरकर यांनी परवानाधारक फेरीवाल्यांवर कारवाई करणार नाही, असे आश्वासन शिवसेनेच्या शिष्टमंडळाला दिले. यावेळी नवी मुंबई हॉकर्स युनियनचे प्रफुल्ल म्हात्रे, शिवसेना शहरप्रमुख विजय माने, उपजिल्हाप्रमुख मनोहर गायखे, विरोधी पक्षनेते मनोज हळदणकर, महिला जिल्हा संघटक रंजना शित्रे आणि अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## गॅस दरवाढ! शिवसेना आमदारांची विधान भवनात निदर्शने

मुंबई, बुधवार – अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या गॅस दरवाढीला विरोध आज तिसऱ्या दिवशीही पाहायला मिळाला. अंगावर गॅस प्रतिकात्मक गॅस सिलिंडरचे चढवून शिवसेना आमदारांनी शासनाच्या विरोधात घोषणा देत विधान भवनाचा परिसर दणाणून सोडला. या गॅस सिलिंडरला घड्याळाच्या बॉम्बची उपमा देत ही दरवाढी मागे घ्या, अशी आग्रही मागणीही करण्यात आली.

गॅस दरवाढीवर पहिल्याच दिवशी काँग्रेस आमदारांनी नाराजी व्यक्त केली. तर दुसऱ्या दिवशी भाजपा आमदारांनी आंदोलन केले. आणि राष्ट्रवादीच्या आमदारांनी ही दरवाढ मागे घ्यावी, असा ठरावही संमत केला. आज शिवसेना आमदार एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक, बालाजी किणीकर, ज्ञानराज चौगुले, सदानंद चव्हाण या आमदारांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसून वाढविण्यात आलेल्या गॅस सिलिंडरच्या दराविरोधात जोरदार घोषणा दिल्या.

गोवा राज्य जर पेट्रोलवरील वाढ कमी करू शकते तर महाराष्ट्र सरकार घरगुती गॅस सिलिंडरचे दर कमी का करू शकत नाही? असा सवाल आमदार एकनाथ शिंदे यांनी केला. हा गॅस सिलिंडर म्हणजे घड्याळ बॉम्ब असल्याची टीकाही त्यांनी केली. विधान भवनात निदर्शने करणाऱ्या या शिवसेनेच्या आमदारांनी अंगावर पुठ्ठ्याचा प्रतिकात्मक गॅस सिलिंडर चढवून प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभेतही घोषणाबाजी केली.

## वेळेवर व विनाअपघात एसटी चालविणाऱ्यांना मिळणार परिवहन पंचकर्म पुरस्कार

रत्नागिरी, ता. २८ – स्वच्छ गाडी, बस स्थानक, वेळेवर गाडी, बिघाडविरहीत गाडी, विनाअपघात सेवा आणि प्रवासी सवलत वाढ या पंचकर्म सूत्रानुसार काम करणाऱ्या एस.टी. आगाराला परिवहन पंचकर्म पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून जिल्ह्यातील नऊ आगारांचा या स्पर्धेत सहभाग आहे. राज्य परिवहन महामंडळाचे उन्हाळी सुट्टीतील प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन उत्पन्न वाढीच्या दृष्टीने आणि आगारामध्ये कायापालट व्हावा, या हेतूने स्पर्धेचे जिल्ह्यात आयोजन करण्यात आले असून एक मार्च ते ३१ मे दरम्यान जिल्ह्यातील नऊ आगारांची पाहणी करून योग्य ते गुण देण्यात येणार आहेत. एस.टी. विभाग नियंत्रक प्रत्येक आगाराला आकस्मित भेट देऊन तपासणी करणार आहेत. त्यामुळे या आगारामध्ये चुरशीची स्पर्धा सुरू आहे. सर्वांबाबतीत आपले आगार परिपूर्ण असावे यासाठी एसटी कर्मचारी आणि अधिकारी प्रयत्न करताना दिसून येत आहेत. स्वच्छ गाडी, स्वच्छ बसस्थानक, वेळेवर गाडी, विनाअपघात सेवा आणि प्रवासी सवलतवाढ हे पंचकर्म या स्पर्धेचे निकष आहेत. या निकषानुसार कार्य करणाऱ्या आगाराला परिवहन पंचकर्म पुरस्कार देण्यात येणार आहे.

# नांदेडात अवतरणार साईबाबांची शिर्डी

नांदेड, ता. २८ – ५ हजार चौरस फुटाचा ५ मजली रंगमंच,१२५ रंगभूमीवरील अभिनय संपन्न कलावंत, करोडो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री साईबाबा यांच्या चरित्रातील २१ प्रसंग , रुपकुमार राठोड, साधना सरगम, कार्तिकी गायकवाड यांच्या आवाजातली सुरेल भजनं अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटकांचा समावेश असलेले मराठी रंगभूमीवरील महानाट्य 'सबका मालिक एक है' १ एप्रिल रोजी नांदेडकर रसिकांना पाहता येणार आहे. अत्यंत देखणी व अविस्मरणीय असलेली ही कलाकृती कोणत्याही साईभक्ताने चूकवू नये असे आवाहन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स्थाई समिती सभापती दिलीप कंदकुर्ते यांनी केले. राम नवमीचा मुहूर्त साधून साईचरित्राचा वेध घेणारे हे नाटक नांदेडकर भाविक व रसिकांना नि:शुल्क पाहाता यावे असा संकल्प संयोजकांनी केला होता. त्या संकल्पाची फलश्रुती १ एप्रिल रोजी शहरातील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियमवर पाहायला मिळणार आहे. 'सबका मालिक एक है' हे अत्यंत भव्य- दिव्य असलेल्या महानाट्यापैकी एक आहे. प्रसिद्ध सिनेअभिनेते अनिल पालकर साईबाबांची मध्यवर्ती भूमिका करणार असून त्यांच्यासह १२५ कलावंत साईचरित्र रंगमंचावर साकारणार आहेत. या महानाट्यासाठी अत्यंत अभ्यासपूर्ण नेपथ्य करण्यात आलेले आहे. त्यामुळे आपण साक्षात शिर्डीत आहोत असा साक्षात्कार प्रेक्षकांना होतो. शिवाय ५ हजार चौरस फुटांचा ५ मजली रंगमचं या महानाट्याचे भव्यपण अधिक ठसठशीत करते. साईबाबांच्या जीवनातील २१ प्रसंग या नाटकात गुंफण्यात आले आहेत. हा अमृतयोग भाविक व रसिकांनी चुकवू नये असे आवाहनही दिलीप कंदकुर्ते, प्रजावाणीचे संपादक गोवर्धन बियाणी, पत्रकार पंढरीनाथ बोकारे व संयोजन समिताने केले आहे.


## जाहीर सूचना

आम जनतेस **सूचना** देण्यात येत आहे की, आम्ही मालक श्रीम. अंकीबाई घमंडीराम गोवानी यांच्या खालील निर्देशित **परिशिष्टात** वर्णिलेले शेअर्स व फ्लॅटच्या संदर्भात (जागा) त्यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर जागा वा तिच्या कोणत्याही हिश्श्यासंदर्भात वारसा, विक्री, अदलाबदल, भाडेकरार, अनुज्ञप्ती, न्यास, धारणाधिकार, देखभाल, सुविधाधिकार, ताबा, गहाण, जप्ती, तारणगहाण, मृत्युपत्रित वारसा, अधिभार, भेट, भार वा अन्य कोणत्याही स्वरूपातील कोणताही हक्क, हित, अधिकार, दावा, मागणी वा हरकत असल्यास त्यां नी सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून **१० (दहा)** दिवसांच्या आत सर्व सहायक दस्तावेजांच्या प्रतींसहित **खेतान अ‍ॅन्ड कं.**, वकील, सॉलिसिटर्स, पेटंट अ‍ॅन्ड ट्रेडमार्क अ‍ॅटर्नी यांना त्यांचा पत्ता वन इंडियाबुल्स सेंटर, १३ वा मजला, टॉवर – १, ८४१, सेनापती बापट मार्ग, मुंबई – ४०० ०१३ या ठिकाणी सूचित करावे अन्यथा असा दावा, मागणी वा हरकत अस्तित्वात नाही असे समजण्यात येईल व असे काही दावे, मागणी वा हरकत कायद्यानुसार अस्तित्वात असल्यासही ते अशा व्यक्तींद्वारे असे दावे मागणी वा हरकत अभित्यागित केले असून असे दावे, मागणी वा हरकत परित्यागित केले आहेत, असे समजण्यात येईल.

**वरील संदर्भित मालमत्तेचे वर्णन (जागा)**

१) शेअर प्रमाणपत्र क्र. १२२, दि. ०७ मार्च, २००८ अंतर्गत जारी विभिन्न क्र. **५९६ ते ६००** (दोन्ही समाविष्ट) धारक ५ (पाच) पूर्णत: देय प्रत्येकी रु. ५०/– मूल्याचे शेअर्स. २) शेअर प्रमाणपत्र क्र. १२७, दि. ०७ मार्च,२००८ अंतर्गत जारी विभिन्न क्र. ६२१ ते ६२५ (दोन्ही समाविष्ट) धारक ५ (पाच) पूर्णत: देय प्रत्येकी रु. ५०/– मूल्याचे शेअर्स ३) शेअर प्रमाणपत्र क्र. १२८, दि. ०७ मार्च,२००८ अंतर्गत जारी विभिन्न क्र. ६७६ ते ६८० (दोन्ही समाविष्ट) धारक ५ (पाच) पूर्णत: देय प्रत्येकी रु. ५०/– मूल्याचे शेअर्स, सर्व शेअर्स नोंदणीकरण जिल्हा मुंबई शहरातील भुलाभाई देसाई रोडचा 'डी' विभाग क्र. डी – ३५३६ (१) पथ क्र. ३ व भुलाभाई देसाई रोडचा डी – ३५३६ (१) पथ क्र. २५–२५ए अंतर्गत मनपा दर व करांच्या निर्धारक व संकलकांद्वारे करनिर्धारक व मलबार हिल विभागाचा सी.एस क्र. ४/७५५ धारक जमिनीवरील पेडर रोड व वार्डनरोड, मुंबई – ४०० ०२६ च्या जंक्शनवरील 'तिरुपती अपार्टमेंट' म्हणून ज्ञात इमारतीच्या 'ए' विंगमधील १४ व्या मजल्यावरीलएकत्रित ३६७६ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्रफळाचे तीन फ्लॅट्स क्र. फ्लॅट क्र. ए९(ए–१४०१ म्हणूनही ज्ञात), ए२(ए–१४०२ म्हणूनही ज्ञात) व ए २(ए–१४०३ म्हणूनही ज्ञात) च्या मालकी हक्कांसहित तिरुपती महालक्ष्मी को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडद्वारे वितरीत, सदर पुरवणी करारांतर्गत हस्तांतरणात उद्‌भवलेल्या सर्व हक्क व लाभांसहित.

दि. २९ मार्च,२०१२

**खेतान अ‍ॅन्ड कं.**

**वकील व सॉलिसिटर्स**

**सही/–**

**सुदीप मुळीक**

रामेश्वर मिडिया

## विटंबना होण्याचा पुन्हा प्रकार दापोली येथे बंदोबस्तात वाढ!

दापोली,ता.२८- दापोली शहराच्या पूर्वे कडील सीमेवर असणाऱ्या टाळदेवाची विटंबना होण्याचा प्रकार उघडकीस आला. महिन्याभरात पुन्हा असा प्रकार घडल्याने दापोलीत तणावपूर्ण शांतता आहे. पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केली असून ते या घडल्याप्रकरणी आरोपींचा कसून शोध घेत आहेत. या टाळदेवाची जेसीबीच्या सहाय्याने होळीच्या रात्री विटंबना करण्यात आली होती. त्यावेळी त्याला जेसीबीच्या सहाय्याने मंदिरातून उखडून दूरवर एका घराजवळ टाकण्यात आले होते. त्यावेळी पोलिसांनी जे.सी.बी. चालक व अन्य दोघा संशयितांना अटक केली होती. यानंतर भाविकांनी या मंदिराची पुन्हा उभारणी केली होती. मंगळवारी भर दुपारी अज्ञात समाजकंटकांनी पहारीच्या सहाय्याने या मंदिराला लावण्यात आलेल्या मार्बलच्या लाद्या उखडून तोडून टाकल्या. ही बातमी दापोलीत पसरल्यावर येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. दापोली पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी येऊन जमावाला शांत केले. घडल्या घटनेचा पोलीस तपास करीत आहेत.

## ‘उमवि’मध्ये राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाबाबत निमंत्रण करून माजी कुलगुरूत मानापमान नाट्य

### कुलगुरूंच्या माफीची मागणी कर्मचारी कुलगुरूंच्या पाठीशी

जळगाव, ता.२८- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रपतींच्या आयोजित कार्यक्रमाच्या आमंत्रणावरून विद्यापीठात मानापमान अध्याय सुरू झाला आहे. कुलगुरूंनी या संदर्भात आवश्यक स्पष्टीकरण दिले असले तरी एका अधिसभा सदस्याने कुलगुरूंनी माफी मागावी, अशी मागणी केली आहे. तथापि विद्यापीठातील बऱ्याच कर्मचारी व अधिकाऱ्यांनी यात कुलगुरू प्रा. मेश्राम यांचे कुठेही चुकले नसल्याचे म्हटले आहे.

राष्ट्रपती सौ. प्रतिभा पाटील यांना २४ मार्च रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे डी लिट ही सन्माननीय पदवी देण्यात आली. तसेच त्यांच्या हस्ते नव्याने बांधण्यात आलेल्या दीक्षांत सभागृहाचे उद्घाटन व नव्या वसतीगृहांचा कोनशिला समारंभ करण्यात आला. असा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व पवित्र वातावरणात संपन्न झाला असला व राष्ट्रपतींनीसुद्धा त्याबाबत आभार प्रकट केलेले असताना माजी कुलगुरूंना निमंत्रण देताना शिष्टाचार पाळला गेला नाही. या मुद्यावरून येथे मानापमान नाट्य सुरू झाले आहे.

विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. एन.के. ठाकरे, प्रा. के.बी. पाटील, प्रा. एस.एफ. पाटील व प्रा. आर. एस. माळी या चौघा माजी कुलगुरूंना कार्यक्रमाचे निमंत्रण देताना डावलण्यात आले, त्यांना त्रयस्थासारखे तसेच सामान्य नागरिकासारखे निमंत्रण पाठवून देण्यात आले. हा एक प्रकारे त्यांचा अवमानच करण्याचा प्रकार झाल्याची चर्चा येथे सुरू झाली आहे.

अधिसभा सदस्य ॲड. अमित दुसाने यांनी याबद्दल नापसंती व्यक्त करून माजी कुलगुरूंना डावलण्यात आल्याबद्दल कुलगुरू प्रा. सुधीर मेश्राम यांनी माफी मागावी, अशी मागणी करीत ३० तारखेच्या सभेत हा विषय घेणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नवे दीक्षांत सभागृह डॉ. के.पी. पाटील यांच्या कार्यकाळात पूर्ण झाले. त्यामुळे निदान त्यांना तरी विशेष आमंत्रितात स्थान द्यायला हवे होते, असे दुसाने यांचे म्हणणे आहे.

या संदर्भात विद्यमान कुलगुरू प्रा. डॉ. मेश्राम यांनी वरील चारही कुलगुरू तसेच प्रभारी माजी कुलगुरू डॉ. शिवाजीराव पाटील यांनाही रितसर निमंत्रण देण्यात आले होते. त्यामुळे त्यांना डावलण्याचा प्रश्नच नसल्याचे आपल्या स्पष्टीकरणात म्हटले आहे.

## राहुरीत कुत्र्याचा पाठलाग करणारा बिबट्या विहिरीत जाऊन पडला

राहुरी, ता.२८- कुत्र्याचा पाठलाग करणारा बिबट्या काल रात्री एका विहिरीत पडल्याची घटना बा.नंदुर रस्त्यावरील घुले वस्तीवर घडली. कुत्रे मेलेले आढळले. मात्र बिबट्याला वर काढण्यासाठी वन विभागाने सकाळी प्रयत्न सुरू केले. नांदुर रस्त्यावरील डिग्रस फाट्यावर बाळासाहेब घुले यांच्या वस्तीशेजारी साडेआठ परस विहिरीत मध्यरात्री कुत्र्याला पकडण्यास गेलेला बिबट्या विहिरीत पडला. कुत्रे गतप्राण झाले. मात्र बिबट्या सकाळपर्यंत पाण्यातच राहिला. सकाळी विहिरीची मोटार चालू करण्यास गेलेल्या घुले यांना विहिरीत बिबट्या पडल्याचे लक्षात येताच त्यांनी वन विभागाला संपर्क केला.

## महाडच्या प्रसिद्ध श्रीराम मंदिराची शतकमहोत्सवी वाटचाल!

महाड, ता.२८- महाड चवदार तळेलगत असलेल्या प्रसिद्ध श्रीराम मंदिराची शतकमहोत्सवी वाटचाल गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्यात आली. या मंदिराचा जीर्णोद्धार शके १८३५ करण्यात आल्याची पाटी मंदिराच्या गाभाऱ्यात आहे. त्यानुसार शके १८३५ म्हणजेच २०१३ मध्ये मंदिराच्या जीर्णोद्धारास १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर मंदिराचे सरपंच जयप्रकाश रहाळकर यांच्या अध्यक्षतेखाली न्यासाची बैठक झाली. त्यात शताब्दी महोत्सवानिमित्त विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला. ऐतिहासिक महाड चवदार तळेलगत असलेले हे श्रीराम मंदिर तमाम भाविकांचे पवित्र श्रद्धास्थान आहे. कळस नसलेल्या जुन्या कौलारू स्वरूपाचे हे मंदिर भाविकांचे अढळ भक्तीस्थान आहे. न्यासाच्या वतीने येथे योगा, बालसंस्कार शिबिर राबविले जातात. श्रीराम नवमी उत्सवाला भाविकांची येथे प्रचंड गर्दी असते. गुढीपाडव्याच्या शुभदिनाचे औचित्य साधून शताब्दी महोत्सवास प्रारंभ करण्यात आला. यानिमित्त आगामी वर्षभराच्या कालावधीत श्रीराम मंदिर ब्राह्मण समाज न्यासाच्या वतीने स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आले. समाजातील प्रत्येक घरातून रोज श्रीरामाची दैनंदिन पूजा, श्रीराम नामाचा महामंत्राचा जप, प्रत्येक शुद्ध नवमीला श्री राम रक्षा विषयावर व्याख्यान, मंदिराच्या १०० वर्षाच्या कारकीर्दीचा मागोवा घेणारी स्मरणिका, माहेरवाशिणींचे स्नेहसंमेलन, वैदिक व धार्मिक कार्यक्रम, रक्तदान शिबिर अशा विविध कार्यक्रमांचा यात समावेश आहे.

## पुण्यात स्वाईन फ्ल्यू

पुणे ता. २८- पुण्यात स्वाईन फ्ल्यूचे पाच रुग्ण खासगी रुग्णालयात आढळल्याने खळबळ उडाली आहे. काही वर्षांपूर्वी पुण्यात स्वाईन फ्ल्यूने थैमान घातले होते. आता पुन्हा स्वाईन फ्ल्यू प्रतिबंधक मास्क घालण्याची वेळ पुणेकरांवर येणार आहे. मुंबईतही दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

## डॉ. अनिल काकोडकर यांना अण्णासाहेब चिरमुले पुरस्कार

सातारा, ता.२८- येथील वा.ग्र. तथा अण्णासाहेब चिरमुले चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा, सन २०११ चा चिरमुले पुरस्कार प्रख्यात अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांना जाहीर झाला आहे. येत्या १ एप्रिलला साताऱ्याच्या शाहू कला मंदिरात समारंभपूर्वक हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. साताऱ्याचे आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते आणि जिल्हाधिकारी डॉ. रामस्वामी एन यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती अर्थतज्ज्ञ पी.एन.जोशी यांनी सातारा येथे दिली. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त करसल्लागार अरुण गोडबोले, एस.व्ही. क्षीरसागर हे उपस्थित होते.

१ लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या कार्यक्रमात अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचे ‘भारताचा ऊर्जा प्रश्न’ या विषयावर व्याख्यान होणार आहे. ट्रस्टतर्फे १९९४ पासून हा पुरस्कार दिला जात असून बँकिंग, विमा, अर्थशास्त्र, उद्योग, तंत्रज्ञान व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. आत्तापर्यंत हा पुरस्कार जे.आ. जोशी. बा.ना. परांजपे, व्ही. चंद्रचूड, दत्तोपंत ठेंगडी, प्रभाकर रेगे, डॉ. आर.एच. पाटील, पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, बाळासाहेब विखे-पाटील, ललिता गुप्ते, विजय भटकर, रघुनाथ माशेलकर, बद्रीनारायण बारवाले, एकनाथ ठाकूर यांना देण्यात आला आहे, अशी माहिती अरुण गोडबोले यांनी दिली.

## कणकवलीचे फसवणूक प्रकरण फरारी विजय राणेचे नाव वेगळेच

सिंधुदुर्ग, ता.२८- कणकवलीतील फसवणूक प्रकरणात विजय राणे याच्या कार्यालयात कामाला असलेली विवाहिता सौ. अनुष्का दयानंद मोंडकर (२८. रा. कणकवली) ही बेपत्ता असून भामट्या विजयचा शोध पोलीस घेत आहेत.

महिलांचे दागिने, किमती चीजवस्तू, रोकड घेऊन पोबारा केलेल्या विजय राणे याचे नाव वेगळे असून आडनांव ‘म्हसणे’ असे असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

या विजयने कणकवलीतील जानवली, आदर्शनगरमध्ये एल.जी. इलेक्टॉनिक्स्च्या एजन्सीचे दुकान थाटून चांगल्या पगाराची नोकरी देतो, असे सांगून व लांजा व रत्नागिरी येथे प्रशिक्षणासाठी रोकड घेऊन जाण्यास सांगून दरोडा पडण्याच्या भीतीने दागिने व १४ लाख रुपयांचा चुना लावून पोबारा केला होता.

## मौजे देवाचे गोठणे, ता. राजापूर येथे भव्य श्रीराम नवमी उत्सव

राजापूर, ता.२८- मौजे देवाचे गोठणे देऊळवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी या ऐतिहासिक गावात १ एप्रिल रोजी दरवर्षीप्रमाणे रामनवमी उत्सव व महाप्रसादाचे आयोजन श्री भार्गवराम उत्सव आणि क्रीडा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेतर्फे करण्यात आले आहे. श्री भार्गवराम गोवर्धनेश्वराचे देवालय सुमारे ३०० वर्षांपूर्वी बांधण्यात आले आहे. हे देवालय छत्रपती शाहू महाराज (सातारा) यांचे ब्रह्मज्ञानी राजगुरू ब्रह्मेंद्रस्वामी यांनी बांधले आहे.

प्रतिष्ठानतर्फे रामनवमी या दिवशी यात्रेकरू रामभक्तांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यासाठी महत्त्वाचे सहकार्य लाभले आहे. सिंधु रत्ना फाउंडेशन ट्रस्ट, सेवाभावी संस्था, सिंधुदुर्ग (तरळा) डॉ. किरण गुजर, डॉ. एम.एम. पटवेकर, डॉ. सुयोग परांजपे, आरोग्य तपासणी व औषधे मोफत देण्यात येतील. वेळ सकाळी ११ ते ४ वा. रामभक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे विजय सदाशिव शेलार (सचिव) व कार्यकारी मंडळातर्फे विनंती करण्यात येत आहे.

घडलंय बिघडलंय



## मोहिले यांचा अखेरचा स्वरसाज

स्वा.सावरकर हे फक्त हिंदूनिष्ठ,देशभक्त नव्हते तर ज्येष्ठ साहित्यिकही होते. त्यांच्या विचारांची प्रतिभा फक्त लेखनातच दिसली नाही तर काव्यातून, गाण्यातूनही उमटलेली आहे. अशा अजरामर गीतांचा गीतसंग्रह प्रेक्षकांच्या भेटीला आणण्याचा निर्णय भरत बलवल्ली या युवा संगीतकाराने घेतलेला आहे. सावरकरांनी आजवर लिहिलेली पण संगीतबद्ध न झालेल्या अशा निवडक गीतांचा हा स्वरसाज आहे. भरतने त्यासाठी अंदमान निकोबार आणि लंडनमधल्या न्यू इंडिया हाऊस येथे भेटी देऊन सावरकर त्यांनी जाणून घेतले. त्यांच्या काव्यसंपदेचा अभ्यास केला आणि त्यातून तयार झालेला अल्बम रसिकांच्या भेटीला येणार आहे. शंकर महादेवन, जसपिंदर नरुला, हरिहरन, सोनू निगम, अनुराधा पौडवाल, साधना सरगम, वैशाली सामंत, स्वप्निल बांदोडकर, नंदेश उमप, सुदेश भोसले, राहुल देशपांडे या दिग्गज गायकांचा स्वर या अल्बमला लाभलेला आहे. महत्त्वाचे म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीला संगीताच्या माध्यमातून वेगळा दर्जा देणारे आणि मंगेशकर कुटुंबियाच्या प्रत्येक कार्यक्रमाच्या संगीत संयोजनात सहभागी असणारे दिवंगत अनिल मोहिले यांनी या अल्बमसाठी संगीत संयोजनाचे काम केलेले आहे. त्यांच्या निधनानंतर प्रकाशित होणार हा अल्बम असून यानिमित्ताने त्यांचा अखेरचा स्वरसाज रसिकांना अनुभवयला मिळणार आहे. भरतने लहानपणापासूनच शास्त्रीय संगीताचे धडे घेतलेले आहेत. पं.यशवंतबुवा जोशी आणि पं.उल्हास कशाळीकर यांचे अनमोल मार्गदर्शन त्याला लाभलेले आहे. संगीत संयोजनाची स्वतःची अशी विद्वत्ता असतानासुद्धा अनिल मोहिले यांचा प्रदीर्घ अनुभव अल्बमची उंची वाढवेल या आशेनेच त्यानी संयोजनाची जबाबदारी मोहिलेंवर सोपवली.

## येवल्यात तीन लाखांचा गांजा पकडला! येवला शहर पोलिसांची कारवाई

येवला, ता. २८ – येवला विचूंर चौफुलीवर सुमारे ५५ किलो गांजा तीन महिला एक पुरुषासह व पाच बॅगा ३ कापडी पिशव्यांसह व दोन मोबाईल जप्त करण्यात आले. तीन लाख रुपये किमतीचे या गांजाची जागतिक बाजारपेठेत किंमत असल्याचे पोलिसांनी माहिती दिली. मंगळवार २७ मार्च दुपारी दोन वाजेच्या सुमारास हे मादक पदार्थ हस्तगत करण्यात आले.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीवरून सदर प्रकार हा पोलिस खबऱ्याकडून गुप्त मिळालेल्या माहितीवरून येवला शहरचे पो.नि.श्रावण सोनवणे यांच्या ही बातमी कळताच त्यांनी या दिलेल्या स्थळी सापळा रचला. साध्या वेशातील पोलिस तैनात करून येवला विंचूर चौफुलीवर मि ळालेल्या वर्णनाचे संशयित व्यक्ती दिसून आले व त्यांच्या बॅगा चेक केल्या असता, त्या बॅगेतून सूमारे ५५ किलो गांजा हस्तगत करण्यात आला.

युव्यंकटरमण नारायण (२८), विजयदुर्गा युव्यंकटरमण (२५), ऐसरस्वती राजू (५०), हे सर्व राहणार नेरडोल (आंध्रप्रदेश) येथील रहिवाशी आहे. हे सर्व जन नाशिक येथे जाणार असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. या सर्वाना येवला शहर पोलिस ठाण्यात आणून त्यांना पोलिस कोठडी देण्यात आली. व पुढील कारवाई साठी कोर्टात हजर करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले

या सर्वावर अद्याप गुन्हा दाखल झालेला नव्हता या सर्वांवर कारवाई होणार असल्याचे पो.नि.श्रावण सोनवणे यांनी सांगितले येवला शहर पोलिसांनी या केलेल्या कारवाईत पो. नि.श्रावण सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार आहेर, पो.ह.ठाकरे, पगारे, बागुल, खळकर, शिंदे मोरे, झीरवळ, केदारे, शिंदे, आदी अधिक तपास करीत आहे.

## जाहीर सूचना

आम जनतेस सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील परिशिष्टात विस्तृतपणे वर्णिलेल्या वेअरहाऊसेसच्या संदर्भात मालकांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. आमचे अशील हे **मे. श्री साई कॉर्पोरेशन**द्वारे विकसित व खालील परिशिष्टात निर्देशित केल्यानुसार त्यांचे संबंधित मालकांद्वारे मालकीच्या तीन वेअरहाऊसेस क्र. १) एल १ अंदाजे १,८५,८३२ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्र, २) के१ अंदाजे १,७१,०६८ चौ. फूट बिल्टअप क्षेत्र व ३) एम१ अंदाजे १,९६,१५६ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्र (**‘मालमत्ता’**) या मालमत्तेचा लीव्ह ॲन्ड लायसेन्स आधारावर ताबा घेऊ इच्छित आहेत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही हिश्श्यासंदर्भात कोणताही हक्क व/वा अधिकार व/वा हितासंदर्भात वारसा, गहाण, विक्री, हस्तांतरण, भाडेपट्टा, धारणाधिकार, अधिभार, न्यास, देखभाल, सुविधाधिकार, अनुज्ञप्ती, भेट, अदलाबदल, ताबा वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी असे हक्क व/वा अधिकार व/वा हित व/वा दावा व/वा मागणी व/वा हरकत आधारित असलेल्या दस्तावेजांच्या प्रमाणित सत्यप्रतींसहित **खेतान ॲन्ड कं.**, वकील, सॉलिसिटर्स, नोटरीज, पेटंट ॲन्ड ट्रेडमार्क ॲटर्नी यांना त्यांचा पत्ता वन इंडियाबुल्स सेंटर, १३ वा मजला, टॉवर - १, ८४१, सेनापती बापट मार्ग, मुंबई - ४०० ०१३ या ठिकाणी सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असा कोणताही हक्क व/वा अधिकार व/वा हित व/वा दावा व/वा मागणी व/वा हरकत कायद्यानुसार अस्तित्वात नाही असे समजण्यात येईल, दावेदारांनी असे हक्क व/वा अधिकार व/वा हित व/वा दावा व/वा मागणी व/वा हरकत अभित्यागित केलेअसून अशा वर्तमान हक्क व/वा अधिकार व/वा हित व/वा दावा व/वा मागणी व/वा हरकत परित्यागित केली आहे व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

### विवरण
(संबंधित जमीन व संबंधित वेअर हाऊसचे वर्णन)
परिशिष्ट

भिवंडी आणि ठाणे नोंदणीकरण उपजिल्हा कार्यालयातील क्षेत्रातील आणि महसूल सागा अर्जुनली, गाव भोईरगाव आणि कुकसे मधील नवीन सर्व्हे क्र. चा भूखंड

| अनु. क्र. | वेअरहाऊस क्र.चे जोते क्र | गाव | नवीन सर्व्हे क्र/हिस्सा क्र. | जमिनीचे क्षेत्रफळ (चौ.मी.मध्ये) | जोत्याचे क्षेत्रफळ चौ.फूटमध्ये (बिल्ट अप) | नमूद केलेल्या नवीन सर्व्हे क्र. वर उभ्या असलेल्या जाते आणि जाते धारकांची नावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १/के-१ | भोईरगाव | २१/१ | १३६८.३६ | ४३,८४४ | पद्माकर पांडुरंग भोईर |
| | | | २०/१ | ९८०.७७ | | |
| | | | २१/४ | ७८४.०७ | | |
| | | | २१/२ | ९४० | | |
| | | | | | | |
| २ | २/के-१ | कुकसे | २०/३ | २०२० | ५४,८०५ | केवल अश्विन गुडका |
| | | | २०/३ | ७९०.१७ | | |
| | | | २०/३ | ६३६.४३ | | |
| | | | २१/३/१ | १०७९.२७ | | |
| | | | २०/२/२ | २७४.७६ | | |
| | | | २०/२/१ बी | २९०.८७ | | |
| | | | | | | |
| ३ | ३/के- १ | कुकसे | ८५/२ | ८३० | ५४,८०५ | प्रतिक्षा पद्माकर भोईर |
| | | | ८६/१ | ५३०.९८ | | |
| | | | ८७/१ | ७५३.०३ | | |
| | | | ८६/२ | ६१४.०२ | | |
| | | | २०/२/१बी | ४००.९८ | | |
| | | | २०/२/२ | ४७८.९२ | | |
| | | | २०/३ | १०० | | |
| | | | २०/३ | १३८३.५७ | | |
| | | | | | | |
| ४ | ४/के-१ | कुकसे | ८६/२ | ६१७.२७ | १२,१३४ | पांडुरंग विठ्ठल भोईर |
| | | | ८५/३ | ५१० | | |
| | | | | | | |
| ५ | ५/के-१ | कुकसे | ८७/३ | ५०९.१० | ५.४८० | केवल अश्विन गुडका |
| | | | | | | |
| **वेअरहाऊस क्र. के १ चे संपूर्ण बिल्टअप क्षेत्रफळ** | | | | | **१,७१,०६८** | |
| ६ | १/एल-१ | कुकसे | २१/४ | १८२२.३१ | ५१,६२० | केवल अश्विन गुडका |
| | | | २१/६ | १३४२.७८ | | |
| | | | २१/३/१ | ७६५.७३ | | |
| | | | २१/७ | ७६८.८६ | | |
| | | | २१/१ | ९५.९१ | | |
| | | | | | | |
| ७ | २/एल-१ | भोईरगाव | २१/३/२ | १८९८.२४ | ४१,२९६ | मनाली केवल गुडका |
| | | | २१/३/१ | १७४५ | | |
| | | | २१/७ | १९३.२४ | | |
| | | | | | | |
| ८ | ३/एल-१ | कुकसे | ८६/१ | १६३९.०२ | ५१,६२० | अश्विन देवराज गुडका |
| | | | ८७/१ | ११४६.९७ | | |
| | | | ८७/२ | ५०२.५१ | | |
| | | | ८६/२ | ६०७.०७ | | |
| | | | २१/३/२ | ९०० | | |
| | | | | | | |
| ९ | ४/एल-१ | कुकसे | ८७/३ | १६४३.७२ | ४१,२९६ | कैलाश अश्विन गुप्ता |
| | | | ८७/५सी | १०१० | | |
| | | | ८६/२ | ९५९.१२ | | |
| | | | ८७/५बी | २२३.६४ | | |
| **वेअरहाऊस क्र. एल-१ चे संपूर्ण बिल्टअप क्षेत्रफळ** | | | | | **१,८५,८३२** | |
| १० | १/एम-१ | कुकसे | २१/६ | १५५०.९४ | **५१,६२०** | पद्माकर पांडुरंग भोईर |
| | | | ८४/२ | १२६७.२८ | | |
| | | | ८४/३ए | ७११.६१ | | |
| | | | २१/७ | १२६५.७५ | | |
| | | | | | | |
| ११ | २/एम-१ | कुकसे | २१/७ | १४४२.१५ | **५१,६२०** | पद्माकर पांडुरंग भोईर |
| | | | ८७/२ | १२६८.८९ | | |
| | | | ८४/३ए | २९१ | | |
| | | | ८४/३सी | ५७१.८० | | |
| | | | ८४/३डी | ८६० | | |
| | | | २१/३/२ | ३६१.७६ | | |
| | | | | | | |
| १२ | ३/एम-१ | कुकसे | ८७/२ | २७७७.३६ | **४१,२९६** | प्रतिक्षा पद्माकर भोईर |
| | | | ८७/३ | ७५९.१२ | | |
| | | | ८६/२ | ३०० | | |
| | | | | | | |
| १३ | ४/एम-१ | कुकसे | ८७/३ | १५५०.८८ | **५१,६२०** | प्रतिक्षा पद्माकर भोईर |
| | | | ८७/३ | ११८६.३१ | | |
| | | | ८६/२ | १४०.१७ | | |
| | | | ८७/५डी | ६१० | | |
| | | | ८७/४ | ५१० | | |
| | | | ८७/५बी | ७९८.२४ | | |
| **वेअरहाऊस क्र. एम-१ चे संपूर्ण बिल्टअप क्षेत्रफळ** | | | | | **१,९६,१५६** | |

**दिनांकीत २९ मार्च, २०१२**

**सही/-**
**खेतान आणि कंपनी करीता**
**ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स**
**सही/-**
**सुदीप मुळीक**

रामेश्वर मिडिया

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# हे नक्षलवादी कसले?

महाराष्ट्राला नक्षलवादाने पुरते जेरीस आणले आहे. गेल्या तीन-चार वर्षांत पाचशे पोलिसांचा बळी घेणाऱ्या नक्षलवादाचा बीमोड करता येत नसेल, तर राज्य सरकारमध्ये इच्छाशक्तीच उरली नसल्याचे सिध्द होते. गडचिरोली जिल्ह्यातल्या उस्टोला भागात नक्षलवाद्यांनी भूसुरुंगाचा स्फोट केला. त्यात १२ जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले. तर २८ जवान जखमी झाले आहेत. केंद्रीय राखीव पोलीस दलाचा ताफा, नक्षलग्रस्त भागातील लोकांना जीवनावश्यक वस्तू, भांडी, बादल्या तसेच शिलाई मशिनसारख्या उपयोगी वस्तू देण्यासाठी निघाले होते. आदिवासींच्या हिताचे नाटक करणाऱ्या नक्षलवाद्यांना ही सरकारी मदत आदिवासींपर्यंत पोहोचू द्यायची नव्हती. कारण अशा मदतीमुळे त्यांच्या नक्षलवादाचा पायाच उखडला जाईल याची त्यांना भीती वाटत होती. सरकारची ही मदत हळूहळू आदिवासींमध्ये लोकप्रिय होत आहे. नक्षलवादी नुसताच हिंसाचार घडवतात. आदिवासींच्या हातात प्रत्यक्षात काही पडत नाही. केवळ भावना भडकावून हिंसाचाराला प्रोत्साहन देणारे नक्षलवादी आदिवासींना एक संकट वाटू लागले आहेत. हळूहळू गडचिरोली भागातला आपला प्रभाव नाहीसा होईल, या भीतीने पछाडलेल्या नक्षलवाद्यांनी पुन्हा एकदा पोलिसांवरच आपला राग काढला आणि भूसुरुंगाचा स्फोट घडवून कृतघ्नपणे १२ जणांचे बळी घेतले. सरकारने आदिवासींसाठी सुरू केलेली मदतीची योजना चांगली आहे. परंतु या मदतीबरोबरच गडचिरोलीच्या जंगलाचे वळवळणारे नक्षलवादाचे सापही ठेचून काढावे लागतील. कारण हे सापच हिंसाचाराचे विष पसरवत आहेत. त्यांचा समूळ बीमोड केल्याशिवाय या मदतीलाही अर्थ उरणार नाही, खरे तर गेली अनेक वर्षे अनेक सुरक्षा यंत्रणा नक्षलवादाविरुध्द लढत आहेत. नक्षलवादाच्या आतापर्यंतच्या कार्यपद्धतीत भूसुरुंग घडवणे किंवा थेट गोळीबार करून हिंसाचाराचे थैमान घालणे, अशा ठराविक गोष्टी घडताना दिसतात. हिंसाचाराची ही पद्धत सुरक्षा यंत्रणांना माहीत असूनही भूसुरुंगांचा शोध घेण्याचे प्रभावी तंत्र तिथे वापरले गेले पाहिजे. एवढेच नव्हे तर कोणत्याही प्रकारच्या स्फोटकाचा वेध घेऊन ते तिथल्या तिथे निकामी करण्याची यंत्रणा बसवली गेली पाहिजे. लपवलेले भूसुरुंग पोलिसांना शोधता येत नसावेत आणि त्याचाच गैरफायदा घेऊन ते हे स्फोट घडवत असावेत. परंतु भूसुरुंग शोधण्याची साधी यंत्रणाही वापरली जात नसेल, तर नक्षलवादाविरुद्धचा सरकारी लढा हा अतिशय प्राथमिक स्तरावर आहे असे म्हणावे लागते.

## पराभूत राजकीय इच्छाशक्ती

आजच्या आधुनिक युगामध्ये दहशतवादाविरुद्ध लढण्याकरिता तितकेच आधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते. अशावेळी भूसुरुंग शोधणे आणि ते निकामी करण्याचे तंत्र जर वापरले जात नसेल, तर नक्षलवाद त्या भागातून संपणारच नाही. नक्षलवादाचे आव्हान हे केवळ गडचिरोलीपुरते मर्यादित नाही तर शेजारच्या मध्य प्रदेशात आणि छत्तीसगढ राज्यातही त्याचा धुमाकूळ चालू असतो. एक विशिष्ट टापू निवडून तिथल्या आदिवासींना चुकीची माहिती द्यायची, त्यांच्या डोळ्यात धूळफेक करून आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचे काम नक्षलवादी लोक करत आहेत. त्यांची हिंसाचाराची पद्धत बघितल्यानंतर ते धड नक्षलवादीही नाहीत आणि धड दहशतवादीही नाहीत केवळ आपले पोट भरणारे गुंड म्हणावे लागतात. जंगलांचा वापर करावा आणि आदिवासींच्या खांद्यावर बंदूक ठेवून खंडणी उकळायची असा पोटभरू धंदा त्यांचा सुरू आहे. त्यांच्या या लढ्यामागे जर खरोखरच काही तत्त्वज्ञान असते तर आतापर्यंत ते यशस्वी झाले असते. माओवादाचा बुरखा पांघरायचा, परदेशातून मिळालेल्या मदतीच्या तुकड्यावर दहशतीचे नाटक करायचे आणि प्रत्यक्षात मात्र स्वत:चे पोट भरायचे अशा प्रकारचा लाजिरवाणा प्रकार नक्षलवादी करत आहेत. ज्या पश्चिम बंगालमध्ये नक्षलवादाचा प्रभाव होता तिथेसुध्दा तो टिकू शकलेला नाही. नक्षलबारी नावाच्या गावातून कनू सन्याल नावाच्या कम्युनिस्ट कार्यकर्त्याने या नक्षलवादाला जन्म दिला. त्या नक्षलबारीवरून नक्षलवाद हे नाव रूढ झाले. त्या नक्षलबारीमध्येसुध्दा आज या नक्षलवादाचे अस्तित्व उरलेले नाही. अशी परिस्थिती असताना कुठेतरी महाराष्ट्राच्या गडचिरोलीच्या दुर्गम भागात किंवा छत्तीसगढसारख्या जंगलग्रस्त भागात नक्षलवादाने थैमान घालण्याचा प्रयत्न करावा ही गोष्टच एका अर्थाने आश्चर्यकारक ठरते. सध्याचा नक्षलवाद म्हणजे केवळ मानगुटीवर बसलेल्या भुताचा संचार आहे. हे भूत मानगुटीवरून उतरवण्याकरिता कोणत्याही मंत्राची नव्हे तर केवळ कठोर अशा पोलिसी तंत्राचीच आवश्यकता आहे. भूसुरुंगाच्या आधारावर थैमान घालणारे हे नक्षलवादाचे भूत पोलीस आणि राज्य सरकारच्या जबरदस्त इच्छाशक्तीवरसुध्दा पराभूत होऊ शकते.

## जवानांच्या धैर्याचे मोल ओळखा

दुर्दैवाचा भाग एवढाच आहे की, आतापर्यंत नक्षलवादाविरुद्ध ज्या कठोरतेने लढा पुकारायला हवा होता तसा पुकारला गेला नाही आणि त्या निष्काळजीपणाचे दुर्दैवी बळी म्हणून पाचशे अशा सामान्य कुटुंबांतल्या पोलिसांना किंवा जवानांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. आज आपण अशा नक्षलवाद्यांनी ठार केलेल्या या जवानांना हुतात्मा हा शब्द वापरून मोकळे होतो. त्यात त्यांच्या बलिदानाचा गौरव होतो. त्यांच्या शौर्याला मानवंदना दिली जाते. यात काही शंका नाही. परंतु हे शौर्य नक्षलवादासारख्या अतिशय साध्या गोष्टीसाठी कामी येते हे दुर्दैव आहे. कारण हा एकेक जवान तयार करण्याकरिता फार कष्ट घ्यावे लागतात. फार मोठ्या इच्छाशक्तीच्या जोरावर हे जवान सुरक्षा दलामध्ये भरती होतात. आपल्या जीवावर ते उदार झालेले असतात. परंतु त्यांच्या हौतात्म्यापेक्षा त्यांचे जिवंत राहणे हे जास्त धैर्यशाली आणि देशाच्या कारणी लागणारे असते. शेवटी देशाचे संरक्षण करताना अशा प्रकारचे हौतात्म्य कोणाच्या ना कोणाच्या वाट्याला येते. परंतु त्याची संख्या कमीत कमी असली पाहिजे आणि या हुतात्म्यांपेक्षा शत्रूच्या मृतात्म्यांची संख्या जास्त असली पाहिजे. एकही नक्षलवादी मरत नसेल आणि पाचशे जवान हुतात्मा होत असतील तर ही गोष्ट अत्यंत चिंताजनक ठरते. त्या हुतात्म्यांच्याच धैर्याचेच मोल सरकारने ओळखले नाही, असा त्यातून अर्थ निघतो.

## मुखशुद्धी

**बाबा :** अगं आजचं वर्तमानपत्र कुठे आहे ?

**आई :** अगंबाई, मी चुकून कचरा टाकला त्यात गुंडाळून...

**बाबा :** मला पाहायचा होता

**आई :** त्यात काय पाहायच होत....? चहाचा चोथा, भाजीचे देठ, केळीची सालच तर होती

## पंचांग

**गुरुवार, २९ मार्च २०१२**

शके १९३४ नंदननामसंवत्सर,

* चैत्र शुक्ल षष्ठी ● **नक्षत्र:** मृग

● रवी उदय ०६-३७, रवी अस्त १८-५१

**जन्मराशी:** ००-०१ ते १६-४५ वृषभ

१६-४६ ते २४-०० मिथुन

**ज्योतिर्लिंग यात्रा**

## कविता: यंदा कर्तव्य आहे

बाळ्याला बाय करताच
ती संत्याला हाय म्हणाली
कळलं हे जेव्हा इन्याला
तेव्हा त्या बिचाऱ्याची झोपच उडाली
म्हणाला तो स्वत:ला
सालं कालचं या बाळ्याचं
प्रेम प्रकरण आटलं
अन् बाळ्याला आता टाकून
चक्क तिनं संत्याला गाठलं
जाऊ देना तिची ती परंपरा आहे
अन् ती प्रत्येकाला भुलवते
मोबाईलच्या एस एम एस नं
ती प्रत्येक कन्ह्याला झुलवते
आहे अशी ती एक बला
मेनका अन् रंभेच्या ही वर
मित्र भावना दुभंग करणारी
शराबी तिची शातीर नजर
अहो स्वार्थाची जणू लाट ती
जीन कैकाना हो बुडवलं
अन् काहिंना मात्र
किनाऱ्याबाहेर अलगद भिरकावलं
जिवाचा प्रत्येक मित्र
आज फितूर झाला
ती फक्त आपली होईल का?
या भ्रमानं आतूर झाला
पण आता कोण सांगणार या वेड्यांना
यांना सांगताना माझ अंत:करण थक्क होतं
यंदा तिचं कर्तव्य आहे
एवढं मात्र पक्क होतं

**– नवनाथ शंकर बनप**
विक्रोळी (प.), पार्कसाईट, संकल्प सो. आनंदगड,
मोबा. ९५९४५१७७२७



# भारत पेट्रोलियम, एअर इंडिया, मुंबई पोलीस, आरसीएफ उपांत्य फेरीत

**मुंबई, बुधवार – विक्रोळी येथील कन्नमवार नगरात सुरू असलेल्या मुंबई महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात भारत पेट्रोलियम, एअर इंडिया, मुंबई पोलीस, आरसीएफ या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात भारत पेट्रोलियमने बँक ऑफ इंडियाचा १९-३ गुणांनी आरामात पराभव केला. पहिल्या सत्रातच १९ गुण मिळवून भारत पेट्रोलियमने आपला विजय निश्चित केला होता. नितीन मदने, निलेश शिंदे भारत पेट्रोलियमतर्फे चमकले.**

दुसऱ्या सामन्यात मनोज कुमार, गौरव शेट्टी यांच्या दमदार खेळाच्या जोरावर एअर इंडियाने साई ॲकॅडमीचा ३०-१७ गुणांनी एकतर्फी लढतीत पराभव केला. इतर सामन्यांत आरसीएफने मुंबई महानगरपालिकेचा ३८-१९ गुणांनी सहज पराभव केला. तो अमोल वडार, चेतन टोपलेच्या दमदार खेळाच्या जोरावर. मुंबई पोलिसांना मात्र ठाणे पोलिसांनी कडवी झुंज दिली. अखेर अटीतटीच्या लढतीत मुंबई पोलिसांनी ही लढत २५-१९ गुणांनी जिंकली. महेश मोकल, आनंद आळवणे मुंबई पोलिसांच्या विजयाचे शिल्पकार होते. पराभूत संघातर्फे निशिकांत पाटील चमकला. महिला विभागात वीरमाता जिजाऊ संघाने चिपळूण अकादमीवर ३७-१३ गुणांनी लीलया विजय मिळविला तो गीता साबळे, सोनाली धुमाळच्या प्रेक्षणीय खेळाच्या जोरावर.

दुसऱ्या सामन्यात डॉ. शिरोडकरने अटीतटीच्या लढतीत साताऱ्याच्या शिवाजी उदय संघावर २९-२७ गुणांनी विजय मिळविला. स्नेहल साळुंके, मेघाली कोरगावकर विजयी संघातर्फे छान खेळल्या. पराभूत संघाची रुबिना शेख चमकली. आणखी एका सामन्यात शिवशक्तीने अमर हिंद मंडळावर १४-७ गुणांनी विजय मिळविला. सायली नागवेकर, सपना पाटील शिवशक्तीच्या विजयाच्या शिल्पकार होत्या. स्पर्धेतील तिसऱ्या दिवसातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून सचिन पाष्टे (आरसीएफ) आणि मोनिका गुंजवले (शिवाजी उदय संघ) यांची निवड करण्यात आली.

# ओरिएंटलची विजयी सलामी

मुंबई, बुधवार – तब्बल १० वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर पुन्हा सुरू करण्यात आलेल्या इन्शुरन्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेत यजमान ओरिएंटल इन्शुरन्स, माझगाव डॉक, टाइम्स ऑफ इंडियाने विजयी सलामी दिली. पहिल्या फेरीच्या सामन्यात ओरिएंटल इन्शुरन्सने जीआयसीचा १०गडी राखून दणदणीत पराभव केला. विजयी संघाच्या संजय नाडकर्णीने नाबाद ३६ धावा केल्या. जितू इंगळेने ३ विजय दीक्षितने ३ आणि विनोद केनीने २ बळी घेतले. दुसऱ्या सामन्यात टाइम्स ऑफ इंडियाने न्यू इंडिया ॲश्युरन्सवर विजय मिळविला. विजयी संघातर्फे शेखर कदमने ५६, अनिलने नाबाद ५७ धावा केल्या. मनोज सिंगने ४ बळी घेतले. आणखी एका सामन्यात माझगाव डॉकने युनायटेड इंडिया इन्शुरन्स संघावर मात केली.

# भूपती-बोपन्ना उपांत्य फेरीत

मियामी, ता. २८ – येथे सुरू असलेल्या सोनी इरिक्सन आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत भारताच्या महेश भूपती आणि रोहन बोपन्नाने पुरुषांच्या दुहेरी गटात उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात भूपती-बोपन्नाने फ्रान्सच्या मायकेल लोड्रा आणि सैबेरियाच्या निनाद झिमोन्झिक जोडीचा अटीतटीच्या लढतीत २-६, ६-३, १०-८ असा तीन सेटमध्ये पराभव केला. भारतीय जोडीला या स्पर्धेत ६ वे मानांकन देण्यात आले आहे. १ तास ८ मिनिटांत भारतीय जोडीने विजय मिळविला. नुकतीच या दोघांनी दुबई आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धा जिंकली होती. शेवटच्या निर्णायक सेटमध्ये भारतीय जोडीने आपला खेळ उंचावून विजयावर शिक्कामोर्तब केले. खास करून महेश भूपतीने आपल्या अनुभवाचा लाभ घेत सुरेख खेळ करत विजयात मोठी भूमिका निभावली.

# जिगरबाज वेटलिफ्टर



**परळला राहणारा ४३ वर्षीय राजेश गोविंद परब या आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग खेळाडूने दुसऱ्यांदा या खेळात जोरदार 'कमबॅक' केले. १९८८ ते ९३ अशी सुरुवातीला या खेळात कारकीर्द करणाऱ्या राजेशला नंतर कायमस्वरूपी नोकरी नसल्यामुळे आणि घरची आर्थिक स्थिती बेताचीच असल्यामुळे ऐन फॉर्मात असताना या खेळात काही काळ 'गॅप' घ्यावी लागली होती. २००३ साली मुंबई महानगरपालिकेत नोकरी लागल्यावर आणि घरची घडी परत व्यवस्थित बसल्यावर त्याने तीन वर्षांपूर्वी पुन्हा स्पर्धात्मक खेळाचा श्रीगणेशा केला.**

तीन वेळा ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजेशने राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्ण, सीनियर राष्ट्रीय स्पर्धेत कांस्य आणि मास्टर्स स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. दोन वेळा त्याने 'कमबॅक' केल्यानंतर सलग दोन वर्षे २०११ आणि २०१२ या वर्षी 'स्ट्राँग मॅन ऑफ दी मुंबई'चा किताब जिंकला. सध्या राजेश अंधेरी (पूर्व) येथील मुंबई महापालिकेच्या गुंदवली कार्यालयात सहाय्यक कर निर्धारक व संकलक विभागात कामास आहे.

बांद्रा फिजिकल कल्चरल असोसिएशनच्या व्यायामशाळेत रोजचा संध्याकाळी तीन-चार तास तो कसून सराव आज देखील करतो. नामवंत प्रशिक्षक मधुकर दरेकर हे त्याचे गुरू. त्यांच्या योग्य मार्गदर्शनाने आणि प्रशिक्षणामुळे आज आपण या खेळात एवढी मोठी झेप घेतल्याचे तो अभिमानाने सांगतो. नुकत्याच गोरेगाव येथे झालेल्या मुंबई महापौर चषक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत विशेष म्हणजे युवा खेळाडूंना मागे टाकून राजेशने सुवर्णपदकाला गवसणी घातली. मुंबई विद्यापीठाच्या कला शाखेचा पदवीधर असलेला राजेश १९८८ साली परळच्या सोशल सर्व्हिस लीग व्यायामशाळेत दाखल झाला. त्याच्या वडिलांना व्यायामाचीच बऱ्यापैकी आवड असल्याने राजेशला फारसा विरोध झाला नाही. त्या काळात सोशल सर्व्हिस लीगमध्ये एका पेक्षा एक सरस पॉवरलिफ्टिंग करणारे खेळाडू होते. या शाळेचे नाव खूप प्रकाशझोतात होते. तिथेच दरेकर सर पॉवरलिफ्टिंग खेळाचे प्रशिक्षण देत असत. सुरुवातीला केवळ व्यायाम करणारा राजेश पॉवरलिफ्टिंगच्या प्रेमात कधी पडला ते कळलेच नाही. सुरुवातीला मधुकर दरेकर सरांनीच त्याला या खेळाचे धडे दिले. २०१० साली परळच्या सोशल सर्व्हिस लिगमध्ये झालेल्या राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत त्याने एकूण ५९५ किलो वजन उचलून आपली सर्वोत्तम कामगिरी नोंदविली होती. सुरुवातीला आई, वडील ३ भाऊ आणि १ बहीण असे कुटुंब होते. आता पत्नी, १ मुलगा आणि १ मुलगी अशी फॅमिली आहे. राजेशने वयाची चाळीशी ओलांडल्यानंतर गुडघे आणि कंबर म्हणावी तशी साथ देत नाही. परंतु या खेळाबाबत असलेली कमालीची आवड आणि अनुभव या जोरावर राजेश आज देखील या खेळात टिकून आहे. संध्याकाळ झाली की, त्याला वेध लागतात ते व्यायामशाळेचे. संतोष बुर्टे, कुणाल सावर्डेकर, यशवंत शिवडीकर हे त्याचे आवडते लिफ्टर. कबड्डी, व्हॉलीबॉल त्याचे आवडते खेळ.

वाचनाची त्याला आवड असून जुन्या हिंदी गाण्याचा तो शौकिन आहे. ऐन उमेदीत असताना काही वर्षे त्याला हा खेळ सोडावा लागला. तरी देखील त्याने जिद्दीने केलेल्या 'कमबॅक'ला तोड नाही. आजपर्यंत या खेळात राजेशला जे काही मिळाले त्याबाबत तो समाधानी आहे. फरक मध्ये काही काळ खंड पडल्यामुळे त्याला हमखास मिळणाऱ्या राज्य शासनाच्या सर्वोच्च शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारापासून वंचित राहावे लागले हे दु:ख मात्र त्याला कुठेतरी बोचत आहे. मुंबई महापालिकेच्या सेवेत कामाला असलेल्या या गुणी खेळाडूला महापालिकेने अधिक सवलती – सुविधा देऊन त्याचा हुरूप जरूर वाढवावा. जेणेकरून मास्टर्स स्पर्धेत तो आणखी यशाची शिखरे सर करेल. भावी काळात जोपर्यंत शरीर आणि मन साथ देईल तोपर्यंत या खेळात अधिक अधिक पदके जिंकण्याचा राजेशचा मानस आहे.

# सी.एस.टी. वरील बजबजपुरी रोखा!

**मनोगत**

छत्रपती शिवाजी टर्मिनस ऐतिहासिक वास्तू म्हणजे आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळाबरोबरच मुंबापुरीचे हृदय म्हटले तरी वावगे ठरू नये. दररोज पन्नास लाख प्रवाशांचा भार सोसणाऱ्या या टर्मिनसला सध्या अनधिकृत फेरीवाल्यांचा व वेश्यांचा वेढा पडलेला दिसतो. स्टेशनच्या आत पोलिसांच्या समक्ष वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया फिरताना दिसतात. हाकेच्या अंतरावर मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालय असताना चोहोबाजूने अनधिकृत फेरीवाल्यांनी आपले बस्तान उत्तम प्रकारे बसविल्याचे आढळते. आर.पी.एफ.चे इन्स्पेक्टर इन्चार्ज श्री शर्मा यांचे कार्यालय फलाट क्र.एक (हार्बर मार्ग)वर आहे. मोजून ५० पावलांवर मेनगेटवर त्यांच्या नाकावर टिच्चून मेनगेटच्या अरुंद जागेत धंदे लावले जातात. प्रवाशांना तेथून मार्ग काढताना कसरत करावी लागते. तर लहान मुले व वृद्धांना नाहक त्रास सोसावा लागतो. महानगरपालिका 'ए' वॉर्डचे कर्मचारी रेल्वे हद्द सांगून हात वर करतात. पदपथ रेल्वेची हद्द कशी होऊ शकते? याचे उत्तर म.न.पा. आयुक्तांनीच द्यावयास हवे. भुयारी मार्गातसुद्धा फेरीवाल्यांनी ठाण मांडले असून तेथील दुकानदारच त्यांना आसरा देऊन त्यांच्याकडून दररोजचे भाडे घेतात. या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी सेंट्रल रेल्वेचे जनरल मॅनेजर, महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त व लोहमार्ग पोलीस अधीक्षक यांनी एकत्र बसून या बजबजपुरीवर उपाययोजना करून छत्रपती शिवाजी टर्मिनस युद्धपातळीवर मोकळे करणे आवश्यक आहे.

**– राजाराम शिवराम रेणुसे,**
विक्रोळी (पूर्व), मुंबई-८३.

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,
जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६
वितरण: २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
info@navakal.org
http://navakal.org
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४





# नवाकाळ

मुंबई, ■ गुरुवार २९ मार्च, २०१२ पान - ८





# दिवेआगारची मूर्ती सापडावी! मुंबईत मंडळांची प्रार्थना


सिद्धिविनायक मंदिर


गणेशगल्ली


शिवडी

मुंबई, बुधवार – दिवेआगारच्या मंदिरातून चोरीला गेलेली गणेशाची सोन्याची मूर्ती परत मिळावी यासाठी काल रात्री मुंबईत जवळजवळ सर्व गणेशमंडळांनी प्रार्थना केली. यावेळी भक्तांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती. लालबाग आणि मलबार हिल येथे गर्दी पाहून पोलिसांची धावपळ झाली. सिद्धिविनायक मंदिरात समन्वय समितीचे अध्यक्ष नरेश दहीबावकर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## पोलीस हवालदाराची तापी नदीत उडी मारून आत्महत्या

शिंदखेडा, ता. २८ – वाचक शाखेतील एका पोलीस कर्मचाऱ्याने तापी नदीत उडी मारून आत्महत्या केली. या घटनेमुळे धुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. आत्महत्येचे निश्चित कारण समजले नसले तरी पोलीस कर्मचाऱ्यांची फसवणूक केल्या प्रकरणात हा पोलीस दोषी आढळल्याने कारवाईच्या भीतीने त्याने आत्महत्या केल्याची चर्चा पोलीस दलात आहे. आज सकाळी आत्महत्या केलेल्या पोलिसाचा मृतदेह सापडला.

जयंत पाटील असे या पोलीस हवालदाराचे नाव असून तो राहायला धुळे येथे होता. त्याने काही वर्षांपूर्वी गृहनिर्माण सोसायटी काढली होती. घरे बांधून देतो, असे सांगत पाटील यांनी काही पोलिसांकडून लाखो रुपये घेतले होते. मात्र घरे बांधून देण्यात पाटील यांना अपयश आले होते. फसवणूक झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांकडे केली होती. प्राथमिक चौकशीत पाटील दोषी आढळले होते. कारवाई होईल या भीतीने पाटील याने आत्महत्या केल्याची चर्चा पोलीस दलात सुरू आहे. पुढील तपास शिंदखेडा पोलीस करत आहेत.

## शिवसेनेच्या युवासेनेने मुंबई विद्यापीठाला टाळे ठोकले

### ‘कुलगुरू हटाव’च्या घोषणांनी विद्यापीठ दुमदुमले

मुंबई, बुधवार – मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये प्रचंड गोंधळ सुरू आहे. परीक्षांच्या आदल्या दिवसांपर्यंत विद्यार्थ्यांना हॉल तिकिट मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थी व पालक सैरभैर झाले आहेत. विद्यापीठाच्या या परीक्षेतील गोंधळाला कुलगुरू डॉ. राजन वेळूकर हेच जबाबदार असून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी शिवसेनेच्या युवासेनेने आज विद्यापीठाच्या सिनेटच्या बैठकीत काळ्या टोप्या व काळ्या रिबिनी बांधून प्रचंड निदर्शने व घोषणाबाजी केली. त्यानंतर युवासेनेने मुंबई विद्यापाठालाच टाळे ठोकले. संध्याकाळी साडेपाच वाजता युवासेनेचे अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेऊन कुलगुरू डॉ. राजन वेळूकर यांनी कुलगुरू पदावरून त्वरित हटवावे, अशी मागणी केली.

आय युवासेनेच्या १० सिनेट सदस्यांनी व शेकडो शिवसैनिकांनी शिवसेनेचे भगवे झेंडे घेऊन आज मुंबई विद्यापीठाच्या सिनेट हॉलमध्ये प्रवेश केला. ‘शिवसेना झिंदाबाद’ व ‘कुलगुरू मुर्दाबाद’च्या घोषणांनी शिवसैनिकांनी सिनेट हॉल दणाणून सोडला. हे शिवसेनेचे सिनेट सदस्य व शिवसैनिक काळ्या टोप्या आणि काळ्या रिबिन घालून आले होते. त्यांनी कुलगुरूंच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली. त्यांतर त्यांनी काळा घोड्यासमोरील विद्यापीठाच्या सिनेट हॉलच्या प्रवेशद्वारालाच टाळे ठोकले.

चार दिवसांपूर्वी टी.वाय.बी.कॉम.च्या परीक्षेच्या हॉल तिकिटाचा गोंधळ झाला. परीक्षेच्या दिवसापर्यंत विद्यार्थ्यांना त्यांची हॉल तिकिटे मिळू शकली नाहीत. त्यांच्या परीक्षा केंद्रांचाही गोंधळ झाला. आज एफ.वाय.बी. कॉमच्या परीक्षेची हॉल तिकिटे वेळेवर मिळाली नाहीत, तिथेही गोंधळ झाला.

त्यानंतर आज झालेल्या टी.वाय.बी.कॉम.च्या नापास झाल्यावर दुसऱ्यांदा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना ‘सेक्शन वन’मध्ये जुन्याऐवजी नवीन अभ्यासक्रमावर प्रश्नपत्रिका देण्यात आली. त्यामुळे तिथेही गोंधळ झाला. परीक्षेत सतत गोंधळ होण्यास विद्यापीठाचे कुलगुरू जबाबदार आहेत. त्यांना साध्या परीक्षाही व्यवस्थित घेता येत नाहीत, असा शिवसेनेच्या युवासेनेचा आरोप आहे.

## भुसावळमध्ये तीव्र पाणीटंचाई

भुसावळ, ता. २८– भुसावळ येथे सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. त्यातच नगरपालिकेने ५० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी कपात करण्याचे संकेत दिले आहेत. तापी नदीवरील लोअर डॅमची पाणी पातळी ४१ सें. मी. व अप बंधाऱ्यातील पाणी पातळी १९० सें. मी. कमी झाली आहे. त्यामुळे रॉ– वॉटर पंपिंग स्टेशनला कमी पाणीपुरवठा होत आहे. हतनूर धरणातून पाणीपुरवठा सोडण्यासाठी पालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन नगरपालिकेने केले आहे.

### नवाकाळ ९० वा वर्धापनदिन योजना

**प्रश्न क्र. ९) भूकंपाची तीव्रता मोजण्यासाठी कोणते परिमाण वापरले जाते?**

पर्याय अ) **डेसिबल**

पर्याय ब) **रिश्टर**

पर्याय क) **एकक**

नवाकाळ
९० वा
वर्धापनदिन योजना
अचूक उत्तर पर्याय क्रमांक
प्रश्न क्र. ९

## शाळात व्यावसायिक बांधकामांना परवानगी देणार नाही

**(पान १ वरून चालू)**

निर्माण होऊ लागल्या आहेत. तसेच दक्षिण मुंबईतील न्युइरा, बिली स्कूल, पाम बिच स्कूल आणि हिंदी विद्याभवन या शाळांत मोठ्याप्रमाणात शुल्क आकारले जात आहे. तर शाळा बंद करून तेथे व्यावसायिक बांधकामे केली जात आहेत, असा गंभीर प्रश्न भाजपा आमदार मंगलप्रभात लोंढा यांनी आज विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला होता. या प्रकरणाची चौकशी करून समिती बनवा अशी मागणी आ. लोढा यांनी केली. या लक्षवेधीवर सर्वपक्षीय आमदारांनी सरकारला धारेवर धरले या लक्षवेधीवर उत्तर देताना शालेय शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा म्हणाले की, मुंबईत प्राथमिक विभागाच्या १०३० तर माध्यमिक विभागाच्या ४५५ शाळा आहेत. काही शाळांत नवीन बांधकामे केली जातात. मात्र जुने बांधकाम पाडून शाळेचे नवीन बांधकाम होत असतील तर अशा शाळांत व्यावसायिक बांधकामांना परवानगी दिली जाणार नाही. मात्र शाळाच नव्हे; तर मुंबईतील कॉलेजही बंद पाडून तेथे व्यावसायिक बांधकामे होत आहेत. अशी बाब अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील यांनी शिक्षणमंत्र्यांच्या निदर्शनास आणून योग्य निर्णय घेण्याच्या सूचना केल्या.

मुंबईतील सर्वच शाळात मोठ्याप्रमाणात शुल्क आकारले जात आहे. या विषयावर सरकार काय करणार आहे. अशी मागणी आ. प्रविण दरेकर, योगेश सागर, नवाब मलिक, अशोक जाधव, मधू चव्हाण, राम कदम यांनी केली. यावेळी आज शिक्षण उपसंचालकांना कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील असे ना. दर्डा यांनी स्पष्ट केले. तर महाराष्ट्र बोर्डाचे इतर बोर्डात रूपांतर करण्यासाठी येत्या दहा दिवसात कठोर नियमावली संकेत स्थळावर टाकण्यात येईल, अशी माहिती देतानाच सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या शाळांना मान्यता द्यायची की नाही, याचा निर्णय सभागृहाने घ्यावा, असे ना. दर्डा म्हणाले.

## हनुमानपाडा रहिवासी ना. कदम यांना भेटणार

**(पान १ वरून चालू)**

आश्वासन देऊन महाराष्ट्राचे वनमंत्री ना. पतंगराव कदम यांची या प्रकरणी भेट मागितली होती. वनमंत्र्यांनी उद्या सकाळी ९ वाजता मलबारहिल येथील त्यांच्या बंगल्यावर भेटीसाठी तत्काळ वेळ दिली आहे. या भेटीसाठी हनुमानपाडा येथील रहिवाशांचे प्रतिनिधी उदय शिर्सेकर, प्रवीण फणसे, भरत वाईकर आणि त्यांच्यासोबत ‘नवाकाळ’च्या संपादिका सौ. जयश्री खाडिलकर-पांडे आणि ‘नवाकाळ’चे यशवंत मोर्ये हे जाणार आहेत. वनमंत्र्यांनी तातडीची वेळ दिल्याबद्दल हनुमानपाड्यातील रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.




## दुष्काळात शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडणार नाही! -मुख्यमंत्र्यांची घोषणा

मुंबई, बुधवार– राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना प्रत्येक जिल्ह्यात धाडण्यात येईल, आवश्यकता वाटल्यास नवीन टँकर विकत घ्या, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या असून शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज विधानसभेत दिले. दुष्काळाच्या चर्चेवर आज विधानसभेत एकूण सहा मंत्र्यांनी आपली निवेदने सादर केली.

राज्यातील दुष्काळाच्या प्रस्तावावर आ. सदाशिवराव पाटील यांच्या २९३ च्या प्रस्तावावर उत्तर देताना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, मागील वर्षी राज्यात सरासरी १०२ टक्के इतका पाऊस पडला. मात्र या पावसात नियमितता नव्हती, तर जाणाऱ्या पावसात कमतरता असल्याने कृषी उत्पन्नात घट झाली आहे. तर कापूस, साखर, कांदा या पिकांवर निर्यातबंदी घातल्याने उत्पादनांच्या दरांवर परिणाम झाला. तर कांद्यावर किमान निर्यातदर कमी करा अशी मागणी केंद्र सरकारला करणार असून गरज पडल्यास थकीत पैसे शासन भरेल असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात ३७३ गावे व २७६ पाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या गावांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी झाली आहे, अशा गावांना तातडीने मदत पोहचविण्याच्या सूचनांचा अध्यादेश आजच जारी करण्यात येईल, असे पतंगराव कदम म्हणाले. यंदा खरिपात ६२०९ तर १५५२ गावांत रब्बी दुष्काळाचा जी.आर.जारी झाला आहे. त्यामुळे या गावात फी माफी, टँकरने पाणीपुरवठा, दुभत्या व सर्व जनावरांना चारा, टंचाईगावात चारा डेपो आणि वीज बिलात ३३ टक्के सवलत देतानाच वीज कनेक्शन न तोडण्याचे आदेश देण्यात आल्याचे पतंगराव कदम यांनी सांगितले. राज्यात यंदा रब्बीचे क्षेत्र २० लाख हेक्टरने कमी झाल्याची माहिती कृषीमंत्री राधाकृष्ण विखे-पाटलांनी दिली. राज्यात सध्या ११५० कोटी रुपयांची ‘रोहयो’ कामे सुरू असून भविष्यात ३००० कोटी रुपयांची कामे सुरू केली जातील, असे रोजगार हमी मंत्री नितिन राऊत यांनी सांगितले. दुष्काळाचा सामना करण्यासाठी विहीर खोल करणे, खाजगी विहीर ताब्यात घेणे, नळ योजना दुरुस्तीसाठी १३९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून ८० कोटी रुपये जिल्ह्यांना दिल्याचे पाणीपुरवठा मंत्री लक्ष्मण ढोबळे यांनी सांगितले. तर या काळात सक्तीची कर्ज वसुली करण्यात येणार नाही, एक लाखापर्यंतच्या पीक कर्जावर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही तर व्याज आकारणाऱ्या बँकेवर कारवाई करण्याचे सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी जाहीर केले.

## मनसे आमदार हर्षवर्धन जाधव शिवसेनेत जाणार

औरंगाबाद, ता.२८– औरंगाबाद जिल्ह्यात मनसे विरुध्द मनसे असा संघर्ष पेटला आहे. मनसेच्या आदेशाविरुध्द बंडखोरी करून जिल्हा परिषदेत शिवसेनेला पाठिंबा देणारे कन्नडचे मनसेचे आमदार हर्षवर्धन जाधव आता शिवसेनेत जाण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे त्यांना धमक्या देणाऱ्या मनसे जिल्हाध्यक्ष दिलीप बनकर यांच्याविरुध्द हर्षवर्धन जाधव यांनी औरंगाबादच्या क्रांती चौक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दिलीप बनकर यांनी हर्षवर्धन जाधव यांना अत्यंत घाणेरड्या शिव्या घालून जीवे मारण्याची धमकी दिली, असे या तक्रारीत म्हटले आहे. याबाबत आमदार हर्षवर्धन जाधव यांनी सांगितले की, राज ठाकरे यांच्याशी माझा झगडा नाही. माझा विठ्ठलाशी झगडा नाही. मी बडव्यांचा शिकार बनलो आहे. मी राज ठाकरे यांच्याशी संपर्क करीत आहे, पण तो होत नाही. मी आमदार प्रविण दरेकर यांना सर्व हकिकत सांगितली आहे. प्रथम २४ मार्चला रात्री साडेदहा ते अकराच्यादरम्यान मला धमकीचा फोन आला. त्यानंतर काल २७ मार्चला मला शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याने अखेर मला पोलिसात तक्रार दाखल करावी लागली. दरम्यान, परदेश दौऱ्यावरून २६ मार्चला मायदेशी परतलेले राज ठाकरे आमदार हर्षवर्धन जाधव यांचे फोन उचलत नाहीत, अशी चर्चा आहे.




## शिर्डी साई संस्थानाच्या अध्यक्षपदी पुन्हा जयंत ससाणे

**(पान १ वरून चालू)** आली आहे. विश्वस्त मंडळात सात काँग्रेस तर सात राष्ट्रवादीचे सदस्य आणि शिर्डी नगर पंचायतीचा एक अध्यक्ष अशा पंधराजणांचा समावेश आहे. कृषी पदवीधर कोट्यातून राधाकृष्ण विखे-पाटील यांची वर्णी लागली आहे, तर त्यांचे विरोधक राजेंद्र पिपाडा यांची राष्ट्रवादीच्या कोट्यातून वर्णी लागली. महिला सदस्यपदी नगर जिल्ह्यातील स्नेहलता बिपीन कोल्हे, विलास कोते, डॉ. प्रकाश नांदूरकर, डॉ. नामदेव गुंजाळ, शैलेश कुटे, सुरेश जाधव, अजित कदम, ॲड. सुरेंद्र खडे, पंतगराव शेळके, मिनानाथ पांडे यांची विश्वस्तपदी नियुक्ती झाली आहे. जुन्या विश्वस्त मंडळातील सदस्य आणि पदाधिकाऱ्यांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना पुन्हा विश्वस्त मंडळात घेऊ नका, अशा आशयाची एक याचिका हायकोर्टात प्रलंबित आहे. मात्र तरीही जयंत ससाणे, राधाकृष्ण विखे-पाटील, शैलेश कुटे या तिघा जुन्या विश्वस्तांची पुन्हा वर्णी लागली .